पांडुरंग बाळकृष्ण चावड.

उपयुक्तकथासंग्रह.

भाग २ रा.

हें पुस्तक

विद्वान् मंडळीच्या साहाय्यानें

नारायण रामचंद्र सोहनी

यांनीं

तयार करून

मुंबईत

आपल्या


जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति १ ली.

आषाढ शुद्ध ५ शके १७९८

सन १८७६

अनुक्रमणिका.


श्रीरामदासस्वामी
कल्याण

श्रीरामदासकृतमनाचेश्लोक

प्रारंभः

गणाधीशजो ईशसर्वांगुणाचा ॥ मुळारंभआरंभतोनिर्गुणाचा ॥
नमोशारदा मूळचत्वारिवाचा ॥ गमोपंथआनंतयाराघवाचा ॥ १॥

॥ १ ॥

मनासज्जनाभक्तिपंथेंचिजावें ॥ नरीश्रीहरी पाविजे तोस्वभावें ॥
जनींनिंद्यतेंसर्वसोडोनि द्यावें ॥ जनींवंद्यतें सर्वभावें करावें ॥ २॥

॥ २ ॥

प्रभाते मनीं रामचिंतीतजावा ॥ पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदाचारहा थोर सांडूं नयेतो ॥ जगींतोचितो मानवांधन्यहोतो ॥

॥ ३ ॥

मनावासनादुष्टकामानयेरे ॥ मनासर्वथापापबुद्धीनकोरे ॥
मनासर्वथानीतिसोडूंनकोहो ॥ मनाअंतरींसारवीचारराहो ॥

॥ ४ ॥

मनापापसंकल्पसोडोनि द्यावा ॥ मनासत्यसंकल्पजीवींधरावा ॥
मनाकल्पनातेनकोवीषयाची ॥ विकारें घडेहोजगीं सर्वछीछी ॥

॥ ५ ॥

नकोरेमनाक्रोधहाखेदकारी ॥ नकोरेमनाकामनानाविकारी ॥
नकोरे मना सर्वदाअंगिकारू ॥ नकोरे मनामत्सरूदंभभारू ॥

॥ ६ ॥

मनाश्रेष्ठधारिष्टजीवींधरावें ॥ मनाबोलणें नीचसोसीतजावें ॥
स्वयेंसर्वदा नम्रवाचेवदावें ॥ मनासर्वलोकांसिरे नीववावें ॥ ७

॥ ७ ॥

देहत्यागितांकीर्तिमागेंउरावी ॥ मनासज्जनाहे क्रियाधरावी ॥
मनाचंदनाचेपरित्वांझिजावें ॥ परीअंतरीं सज्जना नीववावें ॥ ८

नकोरे मना द्रव्य तें पूरिलांचें ॥ अति स्वार्थ बुद्धी नुरे पाप साचें ॥
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें ॥ नहोतां मनासारिखें दुःख मोठें ॥

॥ ९ ॥

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी ॥ दुःखाची स्वयें सांडि जीवीं करावी
देहदुःख तें सूख मानीत जावें ॥ विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें ॥

॥ १० ॥

जनीं सर्व सूखी असा कोण आहे ॥ विचारी मना तूं चि शोधूनि पाहें ॥
मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें ॥ तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥

॥ ११ ॥

मना मानसीं दुःख आणूं नकोरे ॥ मना सर्वथा शोक चिंता नकोरे ॥
विवेकें देहबुद्धि सोडोनि द्यावी ॥ विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥

॥ १२ ॥

मना सांग पां रावणा काय झालें ॥ अकस्मात तें राज्य सर्वहि बुडालें
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं ॥ बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥

॥ १३ ॥

जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला ॥ परी शेवटीं काळ घेऊनि गेला ॥
महाथोर ते मृत्युपंथें चि गेले ॥ असंख्यात ते जन्मले आणि मेले ॥

॥ १४ ॥

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ॥ जितां बोलती सर्वही जीव मी मी ॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती ॥ अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥

॥ १५ ॥

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ॥ अकस्मात तोही पुढें जात आहे ॥
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ होतो ॥ म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतो ॥

॥ १६ ॥

मना मानसीं व्यर्थ चिंता वाहातें ॥ अकस्मात होणार होऊनि जातें ॥
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें ॥ मतीमंद तो खेद मानी वियोगें ॥ १७

मनाराघवावीणआशानकोरे ॥ मनामानवाचीनकोकीर्तितूंरे ॥
जयावर्णितीवेदशास्त्रेंपुराणें ॥ तयावर्णितांसर्वहीश्लाघ्यवाणे ॥

॥१८॥

मनासर्वथासत्यसांडूंनकोरे ॥ मनासर्वथामिथ्य मांडूंनकोरे ॥
मनासत्यतेंसत्यवाचेवदावें ॥ मनामिथ्यतेंमिथ्यसोडोनिद्यावें ॥

॥१९॥

बहूहिंपुटीहोयजेमायपोटीं ॥ नकोरेमनायातनातेचिमोठी ॥
निरोधेंपचेकोंडिलेंगर्भवासीं ॥ अधोमूखरेदुःखत्याबाळकासी ॥

॥२०॥

मनावासनाचूकवीयेरझारा ॥ मनाकामनासोडवीद्रव्यदारा ॥
मनायातनाघोरहेगर्भवासी ॥ मनासज्जनाभेटवीराघवासीं ॥

॥ २१ ॥

मनासज्जनाहीतमाझेंकरावें ॥ रघूनायकादृढचित्तींधरावें ॥
महाराजतोस्वामिवायूसुताचा ॥ जनाउद्धरीनाथलोकत्रयाचा ॥

॥२२॥

नबोलेंमनाराघवावीणकांहीं ॥ जनींवाउगेंबोलतांसौख्यनाहीं ॥
घडीनेंघडीकाळआयुष्यनेतो ॥ देहांतींतुलाकोणसोडूंपहातो ॥

॥२३॥

रघूनायकावीणवांयांशिणावें ॥ जनासारिखेंव्यर्थकांवोसणावें ॥
सदांसर्वदानामवाचेवसोंदे ॥ अहंतामनींपापिणीतेनसोंदे ॥

॥२४॥

मनावीटमानूंनकोबोलण्याचा ॥ पुढेंमागुतारामजोडेलकैंचा ॥
सुखाचीघडीलोटतांसूखआहे ॥ पुढेंसर्वजाईलकांहीनराहे ॥

॥२५॥

देहरक्षणाकारणेंयत्नकेला ॥ परीशेवटींकाळघेऊनिगेला ॥
करीरेमनाभक्तियाराघवाची ॥ पुढेंअंतरींसोडिंचिंताभवाची ॥२६

भवाचे भयेकाय भीतोसि लंडी॥ धरीरे मना धैर्य धाका सि सांडी॥
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं॥ नुपेक्षीकदां कोपल्या दंडधारी
॥ २७॥
दिनानाथ हा राम कोदंडधारी ॥ पुढें देखतां काळ पोटीं थरारी ॥
जनीं वाक्य नेमस्त हें सत्य मानी॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी ॥
॥ २८॥
पदीं राघवाचे सदा ब्रीद गाजे ॥ बळें भक्तरीपू शिरीं कांबि वाजे ॥
पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥
॥ २९॥
समर्थाचिया सेवका वक्र पाहे ॥ असा सर्व भूमंडळीं कोण आहे॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी
॥ ३०॥
महासंकटीं सोडिले देव जेणे॥ प्रतापें बळें आगळा कोटिगूणें ॥
जयातें स्मरे शैलजा शूलपाणी ॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥
॥ ३१॥
अहल्या शिळा राघवें मुक्त केली॥ पदीं लागतां दिव्य होऊनि गेली॥
जया वर्णितां शीणली वेदवाणी॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥
॥ ३२॥
वसे मेरु मांदार हे सृष्टिलीला ॥ शशी सूर्य तारांगणी मेघमाळा ॥
चिरंजीव केले जगीं दास दोन्ही ॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥
॥ ३३॥
सदा सर्वदा देव सन्नीध आहे॥ कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे॥
सुखानंद आनंद कैवल्य दानी॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥
॥ ३४॥
उपेक्षा कधीं रामरूपी असेना॥ जिवा मानवा निश्चयतो वसेना ॥
शिरीं भार वाहे न बोले पुराणी॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥ ३५

असेहोजयाअंतरींभावजैसा॥ वसे होतयाअंतरीं देवतैसा॥
अनन्यासिरक्षीतसेचापपाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥
॥३६॥
सदाचक्रवाकासिमार्तंडजैसा॥ उडीघालितोसंकटींस्वामितैसा॥
हरीभक्तिचाघावघालीनिशाणीं॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥
॥३७॥
मनाप्रार्थनातूजलाएकआहे॥ रघूराजअंकीत होऊनिराहें॥
अवज्ञाकधीं होयदर्शीनकीजे॥ मनासज्जनाराघवीं वस्तिकीजे॥
॥३८॥
जयावर्णितीवेदशास्त्रेंपुराणें॥ तयाचेनियोगेंसमाधानबाणें॥
तयालागिहें सर्व चांचल्यदीजे॥ मनासज्जनाराघवीं वस्तिकीजे॥
॥३९॥
मनापाविजेसर्वहीसूखजेथें॥ अतीआदरें ठेविजे लक्षतेथें॥
विवेकेंकुडीवासना पालटीजे॥ मनासज्जनाराघवीं वस्तिकीजे॥
॥४०॥
बहूहिंडतां सूख होणार नाहीं॥ शिणावेंपरीनातुडे हीतकांहीं॥
विचारेंबराअंतरीं बोधकीजे॥ मनासज्जनाराघवीं वस्तिकीजे॥
॥४१॥
बहूतांपरीहेंचिआतांधरावें॥ रघूनायकाआपुलेंसेंकरावें॥
दिनानाथहातोडरीं ब्रीदगाजे॥ मनासज्जनाराघवीं वस्तिकीजे॥
॥४२॥
मनासज्जनाएकजीवींधरावें॥ जनींआपुलें हीत तूवां करावें॥
रघूनायकावीणबोलोंनकोहो॥ सदामानसींहानिजध्यासराहो॥
॥४३॥
मनारेजनीमौनमुद्राधरावी॥ कथाआदरेंराघवाचीकरावी॥
नसेरामतेंधामसोडोनिद्यावें॥ सुखालागिंआरण्यसेवीतजावें॥४४

जयाचेनिसंगेंसमाधानभंगे ॥ अहंताअकस्मातयेऊनिलागे ॥
तयासंगतीचीजनींकोणगोडी ॥ जियेसंगतीनेमतीरामसोडी ॥

॥ ४५ ॥

मनाजेघडीराघवावीणगेली ॥ जगींतेतुवांआपली हानि केली ॥
रघूनायकावीणतोशीणआहे ॥ जनींदक्षतोलक्षलाऊनिपाहे ॥

॥ ४६ ॥

मनालोचनींश्रीहरीतोचिपाहें ॥ जनींजाणताभक्त होऊनिराहें ॥
गुणींप्रीनलागो क्रमूसाधनाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥

॥ ४७ ॥

सदा देवकाजींझिजे देहज्याचा ॥ सदा रामनामें वदेनित्यवाचा ॥
स्वधर्मेंचिचालेसदाउत्तमाचा ॥ जगींधन्यतोदास सर्वोत्तमाचा ॥

॥ ४८ ॥

सदाबोलण्यासारिखेंचालताहे ॥ अनेकींसदाएक देवासि पाहे ॥
सगूणींभजे लेशनाहीं भ्रमाचा ॥ जगींधन्यतो दास सर्वोत्तमाचा ॥

॥ ४९ ॥

नसेअंतरींकामनानाविकारी ॥ उदासीनतोतापसीब्रह्मचारी ॥
निवालामनींलेशनाहींतमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥

॥ ५० ॥

मदेंमत्सरेंसोडिलीस्वार्थबुद्धी ॥ प्रपंचीकनाहींजयातेंउपाधी ॥
सदाबोलणेनम्रवाचासुवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥

॥ ५१ ॥

क्रमीवेळजोतत्वचिंतानुवादें ॥ नलिंपेकदादंभवादेंविवादें ॥
करीसूखसंवादजोउगमाचा ॥ जगींधन्यतोदास सर्वोत्तमाचा ॥

॥ ५२ ॥

सदाआर्जवींप्रीयजोसर्वलोकीं ॥ सदासर्वदासत्यवादीविवेकी ॥
नबोलेकदामिथ्यवाचात्रिवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५३

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ॥ मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ॥
चळे नाम मनीं निश्चयो दृढ ज्याचा ॥ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

॥ ५४ ॥

नसे मानसीं दुष्ट आशा दुराशा ॥ वसे अंतरीं प्रेम पाशा पिपाशा ॥
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा ॥ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

॥ ५५ ॥

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ॥ स्नेहाळू कृपाळू जगीं दास पाळू ॥
जया अंतरीं क्रोध संताप कैंचा ॥ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

॥ ५६ ॥

जगीं होइजे धन्य या रामनामें ॥ क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ॥
उदासीनता तत्वता सार आहे ॥ सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥

॥ ५७ ॥

नको वीषयीं वासना वृत्तिरूपें ॥ पदार्थीं जडे कामना पूर्वपापें ॥
सदा राम निष्काम चित्तीं वसावा ॥ मनीं कल्पना लेश तोही नसावा ॥

॥ ५८ ॥

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी ॥ नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ॥
मनीं कामना राम नाहीं जयाला ॥ अती आदरें प्रेम नाहीं तयाला ॥

॥ ५९ ॥

मना श्रीराम कल्पतरू कामधेनू ॥ निधी सार चिंतामणी काय वानूं ॥
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ॥ तया साम्यता काय सी कोण आतां ॥

॥ ६० ॥

उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे ॥ तया अंतरीं सर्वदा तें चि राहे ॥
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ॥ पुढें मागुती शोक जीवीं धरावा ॥

॥ ६१ ॥

निजध्यास तो सर्व तूटोनि गेला ॥ बळें अंतरीं शोक संताप ठेला ॥
सुखानंद आनंद भेदें बुडाला ॥ मना निश्चयो सर्व खेदें उडाला ॥ ६२

घरींकामधेनूपुढेंताकमागे ॥ हरीबोधसांडोनिवीवादिंलागे ॥
करींसारचिंतामणी काचखंडे ॥ तया मागतांदेतअसे उदंडें ॥

॥ ६३ ॥

अतीमूढत्या दृढबुद्धीअसेना ॥ अतीकामत्यारामचित्तींवसेना ॥
अतीलोभत्याक्षोभहोईलजाणा ॥ अतीवीषयीसर्वदा दैन्यवाणा ॥

॥ ६४ ॥

नको दैन्यवाणेंजिणेभक्तिवीणें ॥ अतीमूर्खत्या सर्वदा दुःखदेणें ॥
धरींरेमनाआदरेंप्रीतिरामीं ॥ नकोवासना हेमधामींविरामी ॥

॥ ६५ ॥

नव्हेसारसंसार हाघोरआहे ॥ मना सज्जनासर्वशोधोनि पाहें ॥
जनींवीषखातांपुढें सौख्यकैंचें ॥ धरींरेमनाध्यानयारापवाचें ॥

॥ ६६ ॥

घनश्यामहारामलावण्यरूपी ॥ महाधीरगंभीर पूर्णप्रतापी ॥
करीशेवटींशेवकाचाकुडावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ६७ ॥

बळेंआगळारामकोदंडधारी ॥ महाकाळविक्राळतोहीथरारी ॥
पुढेंमानवाकिंकराकोणकेवा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ६८ ॥

सुखानंदकारीनिवारी भयातें ॥ जनींभक्तिभावेंभजावेंतयातें ॥
विवेकेंत्यजावा अनाचारहेवा ॥ प्रभाते मनींरामचिंतीतजावा ॥

॥ ६९ ॥

सदारामनामें वदा पूर्णकामें ॥ कदाबाधिजेना पदानित्यनेमें ॥
मदालस्यहा सर्वसोडोनिद्यावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७० ॥

जयाचेनिनामें महादोषजाती ॥ जयाचेनिनामेंगतीपाविजेती ॥
जयाचेनिनामें घडेपुण्यठेवा ॥ प्रभाते मनींरामचिंतीतजावा ॥ ७१

नवेंचेकदाग्रंथिंचाअर्थकांहीं ॥ स्मरवेंनामउच्चारितांकष्टनाहीं ॥
महाघोरसंसारशत्रूजिणावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७२ ॥

देहदंडणांचेंमहादुःखआहे ॥ महादुःखतेंनामघेतांनराहे ॥
सदाशीवचिंतीतसेदेवदेवा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७३ ॥

बहूतांपरीसंकटेंसाधनाचीं ॥ व्रतेंदानउद्यापनेंतींधनाचीं ॥
दिनाचादयाळूमनींआठवावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७४ ॥

समस्तामधेंसारसाचारआहे ॥ कळेनातरीसर्वशोधोनिपाहें ॥
मनासंशयोवाउगातोत्यजावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७५ ॥

नव्हेकर्मनाधर्मनायोगकांहीं ॥ नव्हेभोगनात्यागनासांगकांहीं ॥
ह्मणेदासविश्वासनामींधरावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥

॥ ७६ ॥

करीकामनिष्कामयाराघवाचें ॥ करीरूपस्वरूपसर्वांजिवांचें ॥
करीछंदनिर्द्वंद्वहेगूणगातां ॥ धरीकीर्तनींत्यानिविश्वासहोतां ॥

॥ ७७ ॥

अहोज्यानरारामविश्वासनाहीं ॥ तयापामराबाधिजेसर्वकांहीं ॥
महाराजतोस्वामिकैवल्यदाता ॥ वृथावाहणेंदेहसंसारचिंता ॥

॥ ७८ ॥

मनापावनाभावनाराघवाची ॥ धरींअंतरींसोडिंचिंताभवाची ॥
भवाचेंभयेंमानवाभूलठेली ॥ नसेवस्तुचीधारणाव्यर्थगेली ॥

॥ ७९ ॥

धराश्रीवरात्याहराअंतरातें ॥ तरादुस्तरात्यापरासागरातें ॥
सरावीसरात्याभरादुर्भरातें ॥ करानीकुरात्यारवरामत्सरातें ॥ ८

मनामत्सरेंनामसोडूनकोहो ॥ अतीआदरें हानिजध्यासराहो ॥
समस्तामतेंनामतेंसारआहे ॥ दुजीतूळणातूळितांहेनसाहे ॥

॥८१॥

बहूनामयारामनामीतुळेना ॥ अभाग्यानरापामराहेंकळेना ॥
विषाऔषधघेतलेंपार्वतीशें ॥ जिवामानवाकींकराकोणपूसे ॥

॥८२॥

जेणेंजाळिलाकामतोरामध्यातो ॥ उमेसीअतीआदरेंगूणगातो ॥
बहूज्ञानवैराग्यसामर्थ्यजेथें ॥ परीअंतरींरामविश्वासतेथें ॥

॥८३॥

विठोनेशिरींवाहिलादेवराणा ॥ तयाअंतरींध्यासरेत्यासिनेणा ॥
निवालास्वयेंतापसीचंद्रमौळी ॥ जिवासोडवीरामहाअंतकाळीं ॥

॥८४॥

भजारामविश्रामयोगेश्वराचा ॥ जपानेमिलानेमगौरीहराचा ॥
निवालास्वयेंतापसीचंद्रमौळी ॥ तुह्मांसोडवीरामहाअंतकाळीं ॥

॥८५॥

सुखीरामविश्रामनेथेंचिआहे ॥ सदानंदआनंदशोधोनिपाहे ॥
नयावीणतोशीणसंदेहकारी ॥ निजध्यासतोशोकसंतापहारी ॥

॥८६॥

मुखींनामत्याकामबाधूंशकेना ॥ गुणीइष्टधारिष्टत्याचेंचुकेना ॥
हरीभक्ततोशक्तुकामासिमारी ॥ जगींधन्यतोमारुतीब्रह्मचारी ॥

॥८७॥

बहूचांगलेंनामयाराघवाचें ॥ अतीसाजिरेंस्वल्पसोपेंफुकाचें ॥
करीमूळनिर्मूळघेतांभवाचें ॥ जिवामानवाहेंचिकैवल्यसाचें ॥

॥८८॥

जनींभोजनींनामवाचेचदावें ॥ अतीआदरेंनामघोषेंह्मणावें ॥
हरीचिंतनींअन्नसेवीतजावें ॥ तरीश्रीहरीपाविजेतोस्वभावें ॥ ८९

नयेरामवाणीतयाथोरहानी॥ जनींव्यर्थप्राणीतयानामकर्णी॥
हरीनामहेंवेदशास्त्रींपुराणीं॥ बहूआगळीबोलिलीवेदवाणी॥
॥९०॥
नकोवीरमानूरघूनायकाचा॥ अतीआदरेंबोलिजेरामवाचा॥
नवेंचेमुखींसांपडेरेफुकाचा॥ कराघोषत्याजानकीवल्लभाचा॥
॥९१॥
अतीआदरेंसर्वहीनामघोषें॥ गिरीकंदरींजाइजेदूरदेशें॥
हरीतुष्टलातोषलानामघोषें॥ विशेषेंहरीमानसींरामपीसें॥
॥९२॥
जगींपाहतांरामहाअन्नदाता॥ तयालागिहोतत्वतासर्वचिंता॥
तयाचेंमुखींनामघेतांफुकाचें॥ मनासांगपांरेतुझेंकायवेंचे॥
॥९३॥
तिन्हींलोकजाळूंशकेकोपयेतां॥ निवालाहरूतोमुखींनामघेतां॥
जपेआदरेंपार्वतीविश्वमाता॥ ह्मणोनीह्मणातेंचिहेंनामआतां॥
॥९४॥
अजामीळपापीवदेपुत्रकामें॥ तयामुक्तिनारायणाचेनिनामें॥
शुकाकारणेंकुंटिणीरामवाणी॥ मुखींबोलतांख्यातिझालीपुराणीं
॥९५॥
महाभक्तप्रल्हादहादैत्यकूळीं॥ जपेरामनामावळीनित्यकाळीं॥
पितापापरूपीतयादेखवेना॥ जनींदैत्यतोनाममूखीं ह्मणेना॥
॥९६॥
मुखींनामनाहींतयामुक्तिकैंची॥ अहंतागुणीयातनातेफुकाची॥
पुढेंअंतयेईलतोदैन्यवाणा॥ ह्मणोनीह्मणारेह्मणादेवराणा॥
॥९७॥
हरीनामनेमस्तपाषाणतारी॥ बहूतारिलेमानवींदेहधारी॥
तयारामनामींसदाजोविकल्पी॥ वदेनाकदांजीवतोपापरूपी॥ ९८

उपयुक्त कथा संग्रह.

जगीं धन्य वाराणशी पुण्यराशी॥ तयां माजि जातां गती पूर्वजांसीं॥
मुखीं राम नामावळी नित्य काळीं॥ जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी॥

॥९९॥

यथा सांग रे कर्म तें ही घडेना॥ घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना॥
दया पाहतां सर्व भूतीं असेना॥ फुकाचें मुखीं नाम तें ही वसेना॥

॥१००॥

जया नावडे नाम त्या यम जाची॥ विकल्पें उठे तर्क त्या नर्क खीळी॥
म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें॥ मुखीं बोलतां दोष जाती स्वभावें॥

॥१०१॥

अती लीनता सर्व भावें स्वभावें॥ जना सज्जना लागिं संतोषवावें॥
देहकारणीं सर्व लावीत जावें॥ सगूणीं अती आदरेंसी भजावें॥

॥१०२॥

हरी कीर्तनीं प्रीति भावें धरावी॥ देहबुद्धि नीरूपणीं वीसरावी॥
परद्रव्य आणीक कांता परावी॥ यदर्थीं स्वियें सांडजीवीं करावी॥

॥१०३॥

क्रियेवीण नानापरी बोलिजे ते॥ परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें॥
मना कल्पना धीट सैराट धांवे॥ तया मानवा देव कैसेनि पावे॥

॥१०४॥

विवेकें क्रिया आपुली पालटावी॥ अती आदरें शुद्ध क्रीया धरावी॥
जगीं बोलण्या सारिखें चाल बापा॥ मनीं कल्पना सोडि संसार तापा॥

॥१०५॥

बरी स्नान संध्या करी एकनिष्ठा॥ विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा॥
दया सर्व भूतीं जया मानवाला॥ सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला॥

॥१०६॥

मना कोप आरोपणा ते नसावी॥ मना बुद्धि हे साधुसंगें वसावी॥
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं॥ मना होय रे मोक्षभोगीं विभागी॥१०७

सदासर्वदासज्जनाचेनियोगें ॥क्रियापालटेभक्तिभावार्थलागे॥
क्रियेवीणवाचाळतातेनिवारी ॥तुटेवादसंवादतोहीतकारी ॥
॥१०८॥
जनीवादसंवादसोडोनिद्यावा॥जनीसूखसंवादसूखेंकरावा॥
जनीतोचितोसूखसंतापहारी॥तुटेवादसंवादतोहीतकारी॥
॥१०९॥
तुटेवादसंवादत्यातेंह्मणावें॥विवेकेंअहंभावत्यातेंजिणावें॥
अहंतागुणेंवादनानाविकारी॥तुटेवादसंवादतोहीतकारी॥
॥११०॥
हिताकारणेंबोलणेंसत्यआहे॥हिताकारणेंसर्वशोधोनिपाहें॥
हिताकारणेंबंडपाखंडवारी॥तुटेवादसंवादतोहीतकारी॥
॥१११॥
जनींसांगतांऐकतांजन्मगेला॥परीवादवीवादतैसाचिठेला॥
उठेसंशयोवादहादंभधारी॥तुटेवादसंवादतोहीतकारी॥
॥११२॥
जनींहीतपंडीतसांगोनिगेले॥अहंतागुणेंब्रह्मराक्षसझाले॥
तयांहूनव्युत्पन्नतोकोणआहे॥मनासर्वजाणीवसोडोनिराहें॥
॥११३॥
तुटेवादसंवादतेथेंकरावा॥विवेकेंअहंभावहापालटावा॥
जनींबोलण्यासारिखेंआचरावें॥क्रियापालटेभक्तिपंथेंचिजावें॥
॥११४॥
फुकाचेंमुखीबोलतांकायवेंचे॥दिसंदीसअभ्यंतरींगर्वसांचे॥
क्रियेवीणवाचाळतां व्यर्थआहे॥विचारीमनातूंचिशोधूनिपाहें॥
॥११५॥
बहूशापितांकष्टलाअंबऋषी॥तयाचेस्वयेंश्रीहरीजन्मसोसी॥
दिल्हाक्षीरसिंधूतयाउपमानी॥तुपेक्षीकदांरामदासाभिमानी॥११६

ध्रुवलेंकरूंवापुडें दैन्यवाणें ॥ कृपाभाकितां दीधली भेटजेणें ॥
चिरंजीवतारांगणी प्रेमरवाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥११७॥

गजेंद्रमहासंकटींवाटपाहे ॥ तयाकारणें श्रीहरीधांवताहे॥
उडीघातली जाहला जीवदानी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥११८॥

अजामीळपापीतयाअंतआला॥ कृपाळूपणेंतोजनींमुक्तकेला॥
अनाथासिआधारहाचक्रपाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥११९॥

विधीकारणेंजाहला मत्स्यवेगीं॥ धरीकूर्मरूपींधरापृष्ठभागीं॥
जनारक्षणाकारणेंनीचयोनी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥१२०॥

महाभक्तप्रल्हादहाकष्टवीला॥ ह्मणोनीतयाकारणेंसिंहझाला॥
नयेज्वाळवीशाळसन्नीधकोणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥१२१॥

कृपाभाकिताजाहलावज्रपाणी॥ तयाकारणेंवामनचक्रपाणी॥
द्विजाकारणें भार्गवचापपाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥१२२॥

अहल्यासतीलागिआरण्यपंथें॥ कुडावापुडें देववंदीतयानें॥
बळेंसोडितांघावघालीनिशाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥१२३॥

तयाद्रौपदीकारणें लागिवेगें॥ त्वरेंधांवतो सर्वसोडोनि मागें॥
कलीलागिझालाअसेबौध्यमोनी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥१२४॥

अनाथांदिनाकारणेंजन्मताहे॥ कलंकीपुढें देव होणारआहे॥
तयावर्णितांशीणली वेदवाणी॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥१२५

जनाकारणे देवलीलावतारी ॥ बहूतांपरीआदरें वेषधारी ॥
तयानेणती ते जनींपापरूपी ॥ दुरात्मे महानष्टचांडाळपापी ॥
॥१२६॥
जगींधन्यतो राममूखीनिवाला ॥ कथाऐकतांसर्वतल्लीनझाला ॥
देहभावनारामबोधेंउडाली ॥ मनावासनारामरूपींनिवाली ॥
॥१२७॥
गतीकारणें संगती सज्जनाची ॥ मतीपालटेसूमती दुर्जनाची ॥
रतीनायकाचापती नष्टआहे ॥ ह्मणोनीमनातीत होवोनिराहें ॥
॥१२८॥
मनाअल्पसंकल्पतोहीनसावा ॥ मनासत्यसंकल्पचित्तींवसावा ॥
जनींजल्पवीकल्पतोहीत्यजावा ॥ रमाकांतएकांत काळीं भजावा ॥
॥१२९॥
मनावासनावासदेवीं वसोंदे ॥ मनाकामनाकामसंगीं नसोंदे ॥
मनाकल्पनावाउगीतेनकीजे ॥ मनासज्जनाराघवींवस्तिकीजे ॥
॥१३०॥
भजायाजनीपाहतांरामएक ॥ करींबाणएक मुखींशब्दएक ॥
क्रियापाहतांउद्धरीसर्वलोक ॥ धराजानकीनायकाचाविवेक ॥
॥१३१॥
विचारूनिबोलेविवंचूनिचाले ॥ तयाचेनिसंतप्त तेहीनिवाले ॥
बरेंशोधिल्यावीणबोलोंनयेहो ॥ जनींबोलणेंशुद्धनेमस्तराहो ॥
॥१३२॥
हरीभक्तवीरक्तविज्ञानराशी ॥ जेणें मानसींस्थापिलेंनिश्चयासीं ॥
तयादर्शनेंस्पर्शनेपुण्यजोडे ॥ तयाभाषणेंनष्टसंदेहमोडे ॥
॥१३३॥
नसेगर्वअंगींसदावीतरागी ॥ क्षमाशांतिभोगी दयादक्षयोगी
नसेलोभनाक्षोभनादैन्यवाणा ॥ अशालक्षणींजाणिजे योगिराणा

धरीरे मना संगती सज्जनाची ॥ जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ॥
बळें भाव हा वृत्ति सन्मार्ग लागे ॥ महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥
॥१३५॥
भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे ॥ भयातीत ते संत आनंत पाहें ॥
जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना ॥ तया मानसीं सर्वथा हें वसेना ॥
॥१३६॥
जिवा श्रेष्ठ तें स्पष्ट सांगोनि गेले ॥ परी जीव अज्ञान तैसेंचि ठेले ॥
देहबुद्धिचा निश्चयो त्या ढळेना ॥ जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥
॥१३७॥
भ्रमें नाडिलें वित्त तें गुप्त झालें ॥ जिवा जन्म दारिद्र्य ठाकूनि आलें ॥
देहबुद्धिचें कर्म खोटें टळेना ॥ जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥
॥१३८॥
पुढें पाहतां सर्वही कोंदलेंसे ॥ अभाग्या नरा दृढ पाषाण भासे ॥
अभावें कदा पुण्य कांहीं फळेना ॥ जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥
॥१३९॥
जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं ॥ गुणें गोविलें जाहलें दुःख देहीं ॥
गुणें वेगळी वृत्ति ते ही वळेना ॥ जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥
॥१४०॥
ह्मणे दास सायास त्याचे करावे ॥ जगीं जाणता पाय त्याचे धरावे ॥
गुरू अंजनेंवीण तें आकळेना ॥ जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥
॥१४१॥
कळेना चळेना वळेना ढळेना ॥ टळेना ढळे संशयो ही ढळेना ॥
गळेना गळेना अहंता गळेना ॥ बळें आकळेना मिळेना मिळेना ॥
॥१४२॥
अविद्यागुणें मानवा ऊमजेना ॥ भ्रमें चूकलें हीत तें पाविजेना ॥
परिक्षेविना बांधिलें दृढ नाणें ॥ परी सत्य मिथ्या असें कोण जाणे ॥ १४३

जगींपाहतां साचलें काय आहे ॥ अतीआदरें सर्व शोधोनि पाहें ॥
पुढें पाहतां पाहतां देव जोडे ॥ भ्रमभ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥

॥ १४४ ॥

सदा वीषयाचिंतितां जीव गेला ॥ अहंभाव अज्ञान जन्मासि आला ॥
विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें ॥ जिवाऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ॥

॥ १४५ ॥

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी ॥ अकस्मात आकारलें सर्व मोडी ॥
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ॥ मना संत आनंत शोधोनि पाहे ॥

॥ १४६ ॥

तुटेना फुटेना चळेना वळेना ॥ सदां संचलें मीपणें आकळेना ॥
तया एक रूपासि दूजें न साहे ॥ मना संत आनंत शोधोनि पाहें ॥

॥ १४७ ॥

निराकार आकार ब्रह्मादिकांचा ॥ जया सांगतां शीणली वेदवाचा ॥
विवेकें तदाकार होऊनि राहे ॥ मना संत आनंत शोधूनि पाहें ॥

॥ १४८ ॥

जगीं पाहतां चर्मचक्षूं निलक्षी ॥ जगीं पाहतां ज्ञानचक्षू निरीक्षी ॥
जगीं पाहतां पाहणें जात आहे ॥ मना संत आनंत शोधूनि पाहे ॥

॥ १४९ ॥

नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं ॥ नसे व्यक्त अव्यक्त नाहींच कांहीं ॥
ह्मणे दास विश्वासता मुक्ति लाहे ॥ मना संत आनंत शोधूनि पाहें ॥

॥ १५० ॥

खरें शोधितां शोधितां शोधिताहे ॥ मना बोधितां बोधितां बोधिताहे ॥
परी सर्व ही सज्जनाचेनि योगें ॥ बरा निश्चयो पाविजे सानुरागें ॥

॥ १५१ ॥

मनीं निर्मिला देव तो वोळखावा ॥ जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ॥
तया निर्गुणालागिं गूणी करावें ॥ जगीं संग सोडोनि सूखी राहावें ॥

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिकर्ता। परा हूनि पर्ता नलिंपे विवर्ता॥
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें॥ जनीं संग सोडोनि सूखी रहावें॥
॥१५३॥
बहूतांपरी कूसरी तत्व झाडा॥ परी अंतरीं पाहिजे तो निवाडा॥
मनासार साचार तें वेगळें रे॥ समस्तां मधें नाम तें आगळें रे॥
॥१५४॥
नव्हे पिंड ज्ञानें नव्हे तत्व ज्ञानें॥ समाधान कांहीं नव्हे तान मानें॥
नव्हे योग यागें नव्हे भोग त्यागें॥ समाधान तें सज्जनाचे नियोगें॥
॥१५५॥
महावाक्य तत्वादिकें पंच कर्णे। खुणे पाविजे संत संगें विवर्णे॥
द्वितीयेस संकेत जो दाविजे तो॥ तयासांडुनी चंद्रमा भाक्षिजे तो॥
॥१५६॥
दिसेना जनीं तें चि शोधोनि पाहें॥ बरें पाहतां गूज तेथें चि आहे॥
करें घेउं जातां कदां आटळेना॥ जनी सर्व कोंदाटलें तें कळेना॥
॥१५७॥
ह्मणे जाणता तो मनी मूर्ख आहे॥ अतर्क्यास तर्की असा कोण आहे॥
जनीं मीपणें पाहतां पाहवेना॥ तया पाहतां वेगळें राहवेना॥
॥१५८॥
बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे॥ जनीं निश्चयो एक तो ही नसाहे॥
मती भांडती शास्त्र बोधें विरोधें॥ गती खुंटती ज्ञान बोधें विरुद्धें॥
॥१५९॥
श्रुती न्याय मीमांसका तर्कशास्त्रें॥ स्मृती वेद वेदांत वाक्यें विचित्रें॥
स्वयें शेष मौनावला स्थीर राहे॥ मना सर्व जाणीव सोडोनि राहें॥
॥१६०॥
जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची॥ तया भोजनाची रुची प्राप्त कैंची॥
अहंभाव जो मानसीं चा विरेना॥ तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना॥१६१

नकोरे नको वाद हा खेदकारी ॥ नकोरे नको भेद नाना विकारी ॥
नकोरे मना सीक रूं पूढिलांसीं ॥ अहंभाव जो राहिला तूजपासी ॥
॥१६२॥
अहंतागुणें सर्वही दुःख होतें ॥ मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ॥
सुखें राहतां सर्वही सूख आहे ॥ अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहें ॥
॥१६३॥
अहंतागुणें नीति सांडी विवेकी ॥ अनीती बळें श्लाघ्यता सर्व लोकीं ॥
परी अंतरीं सर्वही साक्ष येते ॥ प्रमाणांतरीं बुद्धि सांडूनि जाते ॥
॥१६४॥
देहबुद्धिचा निश्चयो दृढ झाला ॥ देहातीत तें हीत सांडीत गेला ॥
देहबुद्धि ते आत्मबुद्धी करावी ॥ सदा संगती सज्जनाची धरावी ॥
॥१६५॥
मनीं कल्पिला वीषयो सोडवावा ॥ मनें देवतो निर्गुणें वोळखावा ॥
मनें कल्पितां कल्पना ते सरावी ॥ सदा संगती सज्जनाची धरावी ॥
॥१६६॥
देहादीक प्रापंच ह्या चिंतियेला ॥ परी अंतरी लोभ निश्चीत ठेला ॥
हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी ॥ सदा संगती सज्जनाची धरावी ॥
॥१६७॥
अहंकार विस्तारला या देहाचा ॥ स्त्रिया पुत्र मित्रादिका या मोहाचा
बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी ॥ सदा संगती सज्जनाची धरावी ॥
॥१६८॥
बरा निश्चयो शाश्वताचा करावा ॥ ह्मणे दास संदेह तो नीरसावा ॥
घडीने घडी सार्थकाची करावी ॥ सदा संगती सज्जनाची धरावी ॥
॥१६९॥
करी वृत्ति जो संत तो संत जाणा ॥ दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ॥
उपाधी देहबुद्धिते वाढवीतो ॥ परी सज्जनाचे विवा धूंश केतो ॥१७०

नसेअंतआनंतसंतांपुसावा॥ अहंकारविस्तारलानीरसावा॥
गुणेवीणनिर्गूणतोआठवावा॥ देहबुद्धिचाआठवोनाठवावा॥
॥१७१॥
देहबुद्धितेस्वामिबोधेंत्यजावी॥ विवेकेंतयावस्तुचीभेटघ्यावी॥
तदाकारहेवृत्तिनाहींस्वभावें॥ म्हणोनीसदातेंचिशोधीतजावें॥
॥१७२॥
असेसारसाचारतेंचोरिलेंसे॥ इहींलोचनींपाहतांदृश्यभासे॥
निराभासनिर्गुणतेंआकळेना॥ अहंतागुणेंकल्पितांहीकळेना॥
॥१७३॥
स्फुरेवीषयींकल्पनातेअविद्या॥ स्फुरेब्रह्मरेजाणमायासुविद्या॥
मुळींकल्पनादोंरुपींतेचिझाली॥ विवेकेंतरीस्वस्वरूपींमिळाली॥
॥१७४॥
स्वरूपींउदेलाअहंकारराहो॥ तेणेंसर्वआच्छादिलेंव्योमपाहो॥
दिशापाहतांनानिशीवाढताहे॥ विवेकेंविचारेंविवंचूनिपाहें॥
॥१७५॥
जयाचक्षनेंलक्षितांलक्षवेना॥ भवाभक्षितांरक्षितांरक्षवेना॥
भयापीततोअक्षयीमोक्षदेता॥ दयादक्षसाक्षीअसेपक्षघेता॥
॥१७६॥
विधीनिर्मितांलीहितोसर्वभाळीं॥ परीलीहितोकोणत्याचेकपाळीं॥
हरूजाळितोलोकसंहारकाळीं॥ परीशेवटींशंकराकोणजाळी॥
॥१७७॥
जगींद्वादशादित्यतेरुद्रअक्रा॥ असंख्यातसंख्याकरीकोणशक्रा॥
जगींदेवधुंडाळितांआटळेना॥ जगींमुख्यतोकोणकैसाकळेना॥
॥१७८॥
फुटेनातुटेनाकदांदेवराणा॥ चळेनाटळेनाकदांदैन्यवाणा॥
कळेनाकळेनाकदांलोचनासी॥ असेनादिसेनाजनामीपणासी॥१७९

जयामानलादेवतो पूजिताहे॥ परीदेवशोधोनिकोणीनपाहे॥
जगींपाहतांदेवकोट्यानुकोटी॥जया मानलीभक्तिजेतेचिमोठी॥
॥१८०॥
तिन्हीलोकजेथूनिनिर्माण झाले॥ तया देवरायासि कोणी नबोले॥
जगीं थोरला देवतो चोरिलासे॥ गुरूवाणतोसर्वथाहीनदीसे॥
॥१८१॥
गुरूपाहतां लक्षकोट्यानुकोटी॥ बहूसाल मंत्रावलीभक्तिमोठी॥
मनाकल्पनाचेटकेंपानपाता॥जनींव्यर्थरेतोनव्हेमुक्तिदाता॥
॥१८२॥
नव्हेचेटकूचाळकूद्रव्यभोंदू॥ नव्हेनिंदकूमत्सरू भक्तिमंदू॥
नव्हेउन्मतुव्यसनीसंगबाधू॥जगींज्ञानियांतोचिसाधूअगाधू॥
॥१८३॥
नव्हेवाउगीचाउटीकामपोटीं॥क्रियेवीणवाचाळता तेचिमोठी॥
मुखींबोलिल्या सारिखेंचालताहे॥ मनासद्गुरूतोचिशोधूनिपाहें॥
॥१८४॥
जनीभक्तज्ञानीविवेकीविरागी॥ कृपाळूमनस्वीक्षमावंतयोगी॥
प्रभूदक्षव्युत्पन्नचातुर्यजाणे॥ तयाचेनियोगेंसमाधानबाणे॥
॥१८५॥
नव्हेतेंचिझालेंनसेतेंचिआलें॥कळोंलागलें सज्जनाचेनिबोलें॥
अनिर्वाच्यतें वाच्य वाचेवदावें॥ मनासंतआनंतशोधीतजावें॥
॥१८६॥
लपावेंअतीआदरेंरामरूपीं॥ भयातीतनिश्चिंतयेस्वस्वरूपी॥
कदातोजनींपाहतांहीदिसेना॥सदाऐक्यतोंभिन्नभावेंवसेना॥
॥१८७॥
सदोसर्वदारामसन्नीधआहे॥मनासज्जनासत्यशोधोनिपाहे॥
अखंडीतभेटीरघूराजयोगू॥मनासांडरेमीपणाचावियोगू॥१८८

श्रुतीनें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे॥ परी सर्वथा स्वस्वरूपीं नसाहे॥
मना भासलें सर्व कांहीं पहावें॥ परी संग सोडोनि सूखी रहावें॥
॥१८९॥
देहभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें॥ विदेहीपणें भक्तिपंथें चि जावें॥
विवेकाबळें निंद्य सर्वी त्यजावें॥ अती आदरें सज्जनालें भजावें॥
॥१९०॥
देहबुद्धिचा निश्चयो ज्या दळेना॥ तया ज्ञान कल्यांत काळीं कळेना॥
परब्रह्म तें मीपणें आकळेना॥ मनीं शून्य अज्ञान हें मावळेना॥
॥१९१॥
मना नाकळे ना ढळे रूप ज्याचें॥ दुजेवीण तें ज्ञान सर्वोत्तमाचें॥
तयावीण तें हीण दृष्टांत पाहे॥ तेथें संग निःसंग दोन्हीं नसाहे॥
॥१९२॥
नव्हे जाणता नेणता देव राणा॥ नये वर्णितां वेदशास्त्रां पुराणा॥
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा॥ श्रुती नेणती नेणती अंत ज्याचा॥
॥१९३॥
जया मुक्तिची वासना पूर्ण आहे॥ तया चीगुरूचे पदीं स्थिरा हे॥
लयें लक्षितां ते स्वरूपीं सरावे॥ स्वयंज्योति पूर्ण प्रकाशे स्वभावें॥
॥१९४॥
वसे मानसीं देव तो कोण कैसा॥ पुसे साधकू आदरें प्रभ जैसा॥
देह टाकितां देव कोठें राहातो॥ अहंमागुता ठाव कोठें पहातो॥
॥१९५॥
वसे त्हृदयीं देव तो जाण ऐसा॥ नभाचे परी व्यापकू सर्व तैसा॥
सदा संचला येत ना जात कांहीं॥ तयावीण कोठें रिता ठाव नाहीं॥
॥१९६॥
नभा सारिखें रूप या राघवाचें॥ मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें॥
तया पाहतां देहबुद्धी उरेना॥ सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना॥१९७॥

नभेंव्यापिलेंसर्व स्पर्शीसआहे ॥ रघूनायकाउपमातेनसाहे ॥
दुजेवीणजोतोचितोहास्वभावें ॥ तयाव्यापकूव्यर्थकैसेंह्मणावें ॥
॥ १९८ ॥
नभींवाबरेजोअणूरेणुकांहीं ॥ रिताठावयाराघवावीणनाहीं ॥
तयापाहतांपाहतांतेंचिझालें ॥ तेथेंलक्ष्यआलक्ष्यसर्वहिबुडालें ॥
॥ १९९ ॥
अतीजीर्णविस्तीर्णतेंरूपआहे ॥ तेथेंतर्कसंपर्कतोहीनसाहे ॥
अतीगूढतेंदृढतात्काळसोपें ॥ दुजेवीणतेरखूणस्वामीप्रतापें ॥
॥ २०० ॥
मनीहूनियांदाविलासर्वहेवा ॥ सदासर्वदाआचरीनीचसेवा ॥
गुरूचेघरींझाडितोसारवीतो ॥ मलातोगमेंभूतळींचारवीतो ॥
॥ २०१ ॥
भवापासूनीसद्गुरूतारितापा ॥ सदासौख्यदेखेदुनीपुण्यपापा ॥
धरींकासमीदासतूझादयाळा ॥ दिनारक्षितूंदीनबंधूकृपाळा ॥
॥ २०२ ॥
पदात्वंपदातत्पदाकांहिंनेणें ॥ तुवांबोधिलेंध्यानतेंएकजाणें ॥
खटाटोपआरोपटाकूनिराहें ॥ त्रिकाळींसदापायतूझेचिपाहें ॥
॥ २०३ ॥
नजायेजपासीनजायेतपासी ॥ नजायेचिकाशीनजायेगयेसी ॥
गुरूचिंतनेवीणकोठेंनजायें ॥ त्रिकाळींसदापायतूझेचिपाहें ॥
॥ २०४ ॥
कळेआकळेरूपतेंज्ञानहोतां ॥ तेथेंआटलीसर्वसाक्षीअवस्था
मनाउन्मनीशब्दकुंठीतराहे ॥ तोयेतोचितोरामसर्वत्रपाहे ॥
॥ २०५ ॥
कदाओळखीमाजिदूजेंअसेना ॥ मनींमानसीद्वैतकाहींदिसेना
बहूतांदिसीआपलीभेटझाली ॥ विदेहीपणेंसर्वकायानिवाली ॥ २०६

मनागूजरे तूं जला प्राम झालें ॥ परी पाहिजे अंतरीं यत्न केले ॥
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी ॥ धरीं संगती सज्जनीं धन्य होसी ॥

॥ २०७ ॥

मना संग हा सर्व सोडोनि द्यावा ॥ अती आदरें सज्जनाचा धरावा ॥
जयाचेनि संगें महादुःख भंगे ॥ जनीं साधनेवीण सन्मार्ग लागे ॥

॥ २०८ ॥

मना संग हा सर्व संगासि तोडी ॥ मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ॥
मना संग हा साधका शीघ्र जोडी ॥ मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥

॥ २०९ ॥

मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ॥ मती मंद ते साधना योग्य होती ॥
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ॥ ह्मणे दास विश्वासता भुक्ति भोगी ॥

॥ २१० ॥

इति रामदासकृत मनाचे श्लोक समाप्त.



ज्ञानदेवकृत हरिपाठ अभंग प्रारंभः

॥ श्रीगणेशाय नमः ॥ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ॥ तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा ॥ पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥ असोनी संसारीं जिव्हे वेग करी ॥ वेदशास्त्र उभारी बाह्य सदा ॥ ३ ॥ ज्ञानदे

व ह्मणे व्यासाचियारखूणा ॥ द्वारकेचा राणा पांडवांघरीं ॥ १॥ ॥ ॥

॥ १ ॥

चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण ॥ अठराही पुराणें हरिसी गाती ॥ १॥ म
नवनीता तैसें घे अनंता ॥ वायां व्यर्थ कथा सांडीं मार्ग ॥ २॥ एक हरी आ
वर्षा विसम ॥ वांयां तूं दुर्गमा न घालीं मन ॥ ३॥ ज्ञानदेवा पाठ हरी हा वैकुंठ
ला घनदाट हरी दीसे ॥ ४॥ ॥ २॥

त्रिगुण असार निर्गुण हें सार ॥ सारासार विचार हरीपाठ ॥ १॥ सगुण निर्गुण-
गुणाचें अगूण ॥ हरीवीण मन व्यर्थ जाय ॥ २॥ अव्यक्त निराकार नाहीं ज्या आका
र ॥ जेथोनी चराचर त्यासी भजे ॥ ३॥ ज्ञानदेवा ध्यानी राम कृष्ण मनी ॥ अनंत
जन्मनी पुण्य होय ॥ ४॥ ॥ ३॥

भावेंवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती ॥ बळेंवीण शक्ती बोलों नये ॥ १॥ कैसेनी दैव
त प्रसन्न त्वरित ॥ उगा राहें नीवांत शिणसी वांयां ॥ २॥ सायास करीसी प्रपं
च दिनानिशी ॥ हरीसीं न भजसी कवण्या गुणें ॥ ३॥ ज्ञानदेव ह्मणे हरीसी
भजणें ॥ तुटेल धरणें प्रपंचाचें ॥ ४॥ ॥ ५॥ ॥ ५॥ ॥

॥ ४ ॥

योगयागविधी येणें नोहे सिद्धी ॥ वांयांची उपाधी दंभधर्म ॥ १॥ भावेंवीण देव
न कळे संदेह ॥ गुरुविण अनूभव कैसा कळे ॥ २॥ तपेंवीण दैवत दिधल्यावीण
प्राप्त ॥ गुजेंवीण हीत कोण सांगे ॥ ३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ॥ साधु-
चे संगातें तरणोपाय ॥ ४॥ ॥ ५॥

साधुबोध झाला तुरोनियां ठेला ॥ ठायींच मूराला अनूभव ॥ १॥ कापुराची वा
ती उजळली जोती ॥ ठायींच समाप्ति झाली जैसी ॥ २॥ मोक्षरेखे आला भाग्यें
विनटला ॥ साधुचा अंकिला हरीभक्त ॥ ३॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं ॥ ह
रीदिसे जनीं वनीं आत्मतत्वीं ॥ ४॥ ॥ ६॥

पर्वता प्रमाणें पातक करणें ॥ वज्रलेप होणें अभक्तांसी ॥ १॥ नाहीं ज्या भक्ती ते
पतीत अभक्त ॥ हरीसीं न भजत दैवहत ॥ २॥ अनंत वाचाळ बरळती बरळ ॥ -
त्यां कैंचा दयाळ पावे हरी ॥ ३॥ ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ॥ सर्वां घटीं

र्णीएकनांदे॥ ४॥ ॥ ७॥

संतांचेसंगती मनो मार्गगती॥ आकळावा श्रीपती येणेंपंथें॥ १॥ रामकृष्णवा चाभावहाजीवाचा॥ आत्माजोशिवाचारामजप॥ २॥ एकतत्वीं नामसाधितीसाधन॥ द्वैताचेबंधन नबाधिजे॥ ३॥ नामामृतगोडी वैष्णवालाधली॥ योगिया साधलीजिवनकळा॥ ४॥ सततउच्चारप्रल्हादींबिंबला॥ उद्धवासाधलाकृष्णदाता॥ ५॥ ज्ञानदेव ह्मणेंनामहेंसुलभ॥ सर्वत्र दुर्लभविरळाजाणें॥ ६॥

॥ ८॥

विष्णुविणेजपव्यर्थत्याचेंज्ञान॥ रामकृष्णींमन नाहींज्याचें॥ १॥ उपजोनीकरंटानेणे अद्वयवाटा॥ रामकृष्णींपैठकेसाहोय॥ २॥ द्वैताची झाडणीगुरुवीणें ज्ञान॥ त्याकैंचेंकीर्तनघडेनामीं॥ ३॥ ज्ञानदेवह्मणेसगुणहेंध्यान॥ नाम पाठ मौन प्रपंचाचें॥ ४॥ ॥ ९॥

त्रिवेणीसंगमींनानातीर्थेंभ्रमी॥ चित्तनाहींनामींतरितेंव्यर्थ॥ १॥ नामासीविन्मुखतोनरपापीया॥ हरिविणेंधांवयानपावेकोणी॥ २॥ पुराणींप्रसिद्धबोलिलेवाल्मिक॥ नामेंतीन्हीलोकउद्धरती॥ ३॥ ज्ञानदेवह्मणेंनामजपाहरिचें॥ परंपरात्याचेंकूळशुद्ध॥ ४ ॥ १०॥

हरीउच्चारणींअनंतपापराशी॥ जातीललयासिक्षणमात्रें॥ १॥ तृण अग्नीमेळें समरस झालें॥ तैसेंनामेंकेलेंजपतांहरी॥ २॥ हरीउच्चारणींमंत्रपैंअगाध॥ पळेभूतबाधाभेणेंयेथें॥ ३॥ ज्ञानदेवह्मणें हरीमाझासमर्थ॥ नकरवे अर्थ उपनिषदां॥ ४॥ ॥ ११॥

तीर्थव्रतनेमभावेवीणसिद्धी॥ वांयांचीउपाधीकरिसीजना॥ १॥ भावबळें आकळेयेरवींनाकळे॥ करतळींआवळेतैसाहरी॥ २॥ पारियाचारवायेतांभूमीवरी॥ यत्नपरोपरी साधन तैसें॥ ३॥ ज्ञानदेवह्मणेनिवृत्तीनिर्गुण॥ दिधलेंसंपूर्णमाझेहातीं॥ ४॥ ॥ १२॥

समाधीहरीचीसमसुखेवीण॥ नसाधेलजाण द्वैतबुद्धी॥ १॥ बुद्धीचेंवैभव अन्यनाहींदुजें॥ एकाकेशवराजे सकळसिद्धी॥ २॥ रिद्धि सिद्धीनिधिअवघीचउपाधि॥ जंवत्यापरमानंदीं मननाहीं॥ ३॥ ज्ञानदेवासम्यरमलेंसमाधान॥

हरीचेंचिंतन सर्वकाळ॥४॥ ॥१३॥

नित्यसत्यमीत हरीपाठ जयासीं॥ कळीकाळ त्यासीं नातकती॥१॥ रामकृष्ण वाचा अनंतराशी तप॥ पापाचे कळप पळतीपुढें॥२॥ हरी हरी हरी मंत्र हाशि वाचा॥ म्हणतीजेवाचा तयां मोक्ष॥३॥ ज्ञानदेवपाठ नारायण नाम॥ पाविजे उत्तम निजस्थान॥४॥ ॥१४॥

एकनाम हरी द्वैत नाम दुरी॥ अद्वैत कुसरी विरळा जाणें॥१॥ समबुद्धीघेतां समान श्रीहरी॥ शमदमावरी हरीझाला॥२॥ सर्वां घटीं राम देहादेहीं एक॥ सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी॥३॥ ज्ञानदेवाचित्तीं हरीपाठनेमा॥ मागीलियेजन्मा- मुक्त जाहालों॥४॥ ॥१५॥

हरीनामजपे तोनरदुर्लभ॥ वाचेसीं सुलभ रामकृष्ण॥१॥ रामकृष्णनामीं उ- न्मनीसाधिली॥ तयासींलाधली सकळसिद्धी॥२॥ सिद्धीबुद्धीधर्म हरीपाठीं- आलें॥ प्रपंचीनिमालेसाधूसंगें॥३॥ ज्ञानदेवानाम रामकृष्णी ठसा॥ येणें द शदिशा आत्माराम॥४॥ ॥१६॥

हरीपाठकीर्तीमुखींजरीगाय॥ पवित्रतो होय देहत्याचा॥१॥ तपाचें सामर्थ्य त पीनलाअमूप॥ चिरंजीवीकल्पकोटीनांदे॥२॥ मातृपितृभ्राता सगोत्रअपार ॥ चतुर्भुजनर होउनीठेले॥३॥ ज्ञानगूढगम्य ज्ञानदेवालाधलें॥ निवृत्तीनें दि ल्हेमाझेहातीं॥४॥ ॥१७॥

हरिवंशपुराण हरिनामकीर्तन॥ हरीवीणें सौजन्य नेणेंकांहीं॥१॥ त्यानराल धलेंवैकुंठजोडलें॥ सकळघडलेंतीर्थाटण॥२॥ मनोमार्गीगेलातोयेथेंमूक- ला॥ हरिपाठिंस्थीरलातोचिधन्य॥३॥ ज्ञानदेवागोडी हरीनामाचीजोडी॥ रामकृष्ण आवडिसर्वकाळ॥४॥ ॥१८॥

वेदशास्त्रप्रमाणश्रुतीचेंवचन॥ एकनारायणसारजप॥१॥ जपतपकर्मक्रियाने मधर्म॥ वाउगाचीश्रमव्यर्थजाय॥२॥ हरीपाठींगेलेतेनिवांतचीठेले॥ भ्रमरगुं तलेसुमनकळिके॥३॥ ज्ञानदेवींमंत्र हरीनामाचेंशस्त्र॥ यमेंकूळगोत्रवर्जिये लें॥४॥ ॥१९॥

नामसंकीर्तनीवैष्णवाचीजोडी॥ पापेंअनंतकोडीगेलींत्याचीं॥१॥ अनंतज

म्याचेंनपएकनाम॥ सर्वमार्गसुगम हरीपाठ॥२॥ योगयागक्रियाधर्माधर्म-
माया॥ गेलेंनेंवीलयांहरीपाठीं॥३॥ ज्ञानदेवींयज्ञयागक्रियाधर्म॥ हरीवी
णानेम नाहींदुजा॥४॥ ॥२०॥
काळवेळनामउच्चारितांनाहीं॥ दोन्हीपक्षपांहींउद्धरती॥१॥ रामकृष्णनामस
र्वदोषहरण॥ जडजीवातारण हरीएक॥२॥ हरीनामसारजिव्हायानामाची॥
उपमात्यादेवाची कोणवानी॥३॥ ज्ञानदेवींसांगझालानामपाठ॥ पूर्वजांवै
कुंठमार्गसोपा॥४॥ ॥२१॥
नित्यनेमनामीं तेप्राणी दुर्लभ॥ लक्ष्मी वल्लभतयांजवळी॥१॥ नारायणहरी
नारायणहरी॥ भक्तिमुक्ती च्यारी घरींत्याच्या॥२॥ हरीवीणजन्मनर्कचीपैंजा
ण॥ यमाचापाहुणा प्राणी होय॥३॥ ज्ञानदेवपूसेंनिवृत्तीसीं चाड॥ गगनाहु
नीवाड नामआहे॥४॥ ॥२२॥
सातपांचतीनदशकांचा मेळा॥ एकतत्वीं कळा दावी हरी॥१॥ तैसेंनव्हे नामस
र्वत्रवरीष्ठ॥ येथेंकांहींकष्ट नलागती॥२॥ अजपाजपणें उलटप्राणाचा॥ येथें
हीनामाचानिर्धारअसे॥३॥ ज्ञानदेवाजिणेंनामावीण व्यर्थ॥ रामकृष्णींपंथ
क्रमीयेला॥४॥ ॥२३॥
जपतपकर्मक्रियानेमधर्म॥ सर्वांघटींरामभावशुद्ध॥१॥ नसोडीहाभावटाका
किरे संदेहो॥ रामकृष्णींटाहोनित्यफोडी॥२॥ जातीवित्तगोतकुळसीळमात
॥ भजेकांत्वरितभावयुक्त॥३॥ ज्ञानदेवाध्यानीं रामकृष्ण मनीं॥ वैकुंठभुवनीं
घरकेलें॥४॥ ॥२४॥
जाणीवनेणीवभगवंतीनाहीं॥ दोन्हीपक्षपांहींउद्धरती॥१॥ नारायणहरीउ
च्चारनामाचा॥ तेथेंकळिकाळाचाशीघनाहीं॥२॥ तेथीलप्रमाणनेणवेवेदांसी
॥ तेंजीवजंतुसीं केवीकळे॥३॥ ज्ञानदेवाफळनारायणपाठ॥ सर्वत्रवैकुंठके-
लाअसे॥४॥ ॥२५॥
एकतत्वनामदृढधरीमना॥ हरीसीकरुणायेईलतूझी॥१॥ तेंनामसोपेंरेरा
मकृष्णगोविंद॥ वाचेसीसद्दृढजपाआधी॥२॥ नामापरतेंतत्वनाहींरेअन्य
था॥ वांयांआणिकापंथाजासिलझणी॥३॥ ज्ञानदेवामौनजपमाळअंतरीं॥

धरोनीश्रीहरीजपेसदां ॥४॥ ॥२६॥

सर्वसूखगोडीसाहीशास्त्रनीवडीं ॥ रिकामाअर्धघडीराहूं नको ॥ १॥ लटिकाव्यवहारसर्व हासंसार ॥ वांयां येरझार हरीवीणें ॥ २॥ राममंत्रजपकोटीजाईल पाप ॥ रामकृष्णीं संकल्पधरुनी राहें ॥ ३॥ निजवृत्ती काटींसर्व मायातोडीं ॥ इंद्रियांसवाडिलपूं नको ॥ ४॥ तीर्थीव्रतींभावधरींरेकरुणा ॥ शांतिदयापाहुणा हरीकरी ॥ ५॥ ज्ञानदेवा प्रमाण निवृत्ती देवीज्ञान ॥ समाधीसंजीवन हरीपाठ ॥ ६

॥ २७॥

अभंगहरीपाठअसतीअठ्ठावीस ॥ रचिलेविश्वासें ज्ञान देवें ॥ १॥ नित्यपाठकरीइंद्रायणी तीरीं ॥ होयअधीकारीसर्वदातो ॥ २॥ असावेंस्वस्थचित्तएकाग्रीतें मन ॥ उल्हासेंकरुनस्मरणजीव ॥ ३॥ अंतकाळींतैसासंकटाचे वेळीं ॥ हरीत यासांभाळिअंतबाह्य ॥ ४॥ संतसज्जनानींघेतली प्रचिती ॥ आळसीमंदमती केवीतरे ॥ ॥५॥ श्रीगुरुनिवृत्ती वचनीतोमेळ ॥ तोषलातात्काळ ज्ञानदेव ॥ ६॥ ॥२८॥

॥ इतिज्ञानदेवकृत हरीपाठाचेअभंग समाप्त.



अथगर्गाचार्यकृत प्रश्नावळीप्रारंभ:

या खालीं लिहिलेले कोष्टकांतील अंकावर सुपारी ठेवून अंकाचा प्रश्न वाचून पहावा, आणि त्या प्रमाणें सांगावें. किंवा द्वळखुंडाचा फांसा करावा आणि तीन डाव टाकावे मोजणीस येतील त्या आंकड्याचा प्रश्न पहावा.

पांच पानांचा विडा, सुपारी, नारळ ठेवून नमस्कारकरावा· स्नान करून धूप, दीपें देवाची पूजा करून प्रश्न दिन शुद्धी किंवा तोधडा पाहून सुपारी किंवा फांसाटाकून पहाणें सत्यजाण·

१११	११२	११३	११४	१२१	१२२	१२३	१२४
१३१	१३२	१३३	१३४	१४१	१४२	१४३	१४४
२११	२१२	२१३	२१४	२२१	२२२	२२३	२२४
२३१	२३२	२३३	२३४	२४१	२४२	२४३	२४४
३११	३१२	३१३	३१४	३२१	३२२	३२३	३२४
३३१	३३२	३३३	३३४	३४१	३४२	३४३	३४४
४११	४१२	४१३	४१४	४२१	४२२	४२३	४२४
४३१	४३२	४३३	४३४	४४१	५४२	४४३	४४४

१११ हाप्रश्न बहुत उत्तम असे इच्छिले मनोरथ कार्यसिद्धी पावेल· वादांतविजयीहोसील· नवाहार होईल देवलाभ होईल· दिवस बरे आले असत मनकामना सिद्ध होईल याची खूण तुझे उजवे बाजूवर तीळ असे·

११२ या प्रश्नाचें फळ मध्यम असे· दुसरें कार्य कीजे· हेंकाम न होय तुझे मनांत बहुत चिंता असे कुळदेवतेची पूजा करावी तेणेंकरून चिंता दूर होईल· याची खूण तुझी बायको लटकें बोलत्ये·

११३ या प्रश्नाचें फळ अंकावर थोर लाभ झाला चिंता मिटेल· शुभ प्राप्ती सुख होय मध्यम दिवस होते ते गेले आतां तुला बरवे दिवस आले आहेत तूं मनांत विश्वास ठेवणें· याची खूण तुझे उजवे कुशीवर तीळ असे·

११४ हा प्रश्न बहुत उत्तम असे· कुळदेवता इष्ट होय· कल्याण होईल· भूमीं लाभ होईल अर्थलाभ असे सोयरीक होईल· आजपासून तीन महिन्यांत बरें होईल· आणि आपल्या देवाची व गुरूची मनोभावें करून भक्ती करावी· मनकामना सिद्ध होईल· याची खूण तुझे स्त्रीचे पोटावर तीळ असे·

१२१ हा शाकून बरा असे· कांहीं कार्य लाभ असे श्री कुळदेवतेचें पूजन करावें ठिकाण लाभ होईल· मित्राची भेट होईल· ज्या वस्तूची भेट इच्छितोस ती भेट·

होईल. द्रव्यलाभ होईल, काळजी चिंता हरेल, सुख प्राप्त होईल, याची खूण तु-
झे उजवे जंघेवर तीळ असे.

१२२ हा शकून द्रव्याचा असे करण्यांत धंद्यांत लाभ असे परदेशासी व
परे गांवासीं मोठें भय होईल. परंतु तूं कोणाचा विश्वास धरूं नको आपल्या
समजा प्रमाणें करावें याची खूण तुजवर मातबर स्त्रीची प्रीत असे.

१२३ हा प्रश्न बहुत शुभ असे. कार्य सिद्धी होईल कुटुंब वृद्धी होईल. स्त्री
लाभव स्नेहाची भेट होईल. परगांवाहून मोठी खुशाली होईल चिंता असे.
लती पांचदिवसांत मिटेल. शत्रूचा नाश होईल. तुला बरवे दिवस आले असत
याची खूण तूं धर्म करितोस व मग पस्तावा करितोस.

१२४ हा प्रश्न मांगलिक असे बंधूसी प्रीतीची वृद्धी होईल. मनाची चिंता-
जाईल. पुत्रलाभ होईल तुजला पदलाभ होईल. राजद्वारीं सन्मान होईल. म
नाची चिंता दूर होईल. कुळदेवतेची पूजा कीजे तेणें कार्य सिद्धी होईल याची
खूण तुला गुप्त चिंता तीनदिवसांत झाली असे.

१३१ हा प्रश्न द्रव्याचा असे. कुटुंब वृद्धी होईल. द्रव्य लाभ असे. वस्तू गे-
ली असेती प्राप्त होईल. ज्यासीं स्नेह तुझला असेल तो स्नेह वृद्धिंगत होईल.
स्त्री पुत्रांस सुख होईल. जो प्रश्न केला असेल तो विचारें करावा उतावळी नकरा
वी या वर्षांत आनंद बहुत होईल. याची खूण तुला घराची चिंता बहुत असे बा
हेर राहातोस.

१३२ हा प्रश्न जय असे ज्या कार्याची चिंता बहुत करितोस तें कार्य सिद्धी-
पावशील. स्त्रीची भेट होईल स्नेहासी प्रीती होईल. मनीं गुप्त एक चिंता असे तो
एक शत्रू मोहांत पडेल. सत्य जाणिजे. पुत्रलाभ. पूर्व दिशेहून लाभ होईल. तुझें
द्रव्य येईल परंतु देवतांची पूजा कीजे मनकामना सिद्ध पावेल. याची खूण उज
वे बाजूस इंद्रियावर तीळ असे.

१३३ हा प्रश्न मध्यम असे मनास चिंता द्रव्य हानी होय. शरीरीं कष्ट होय. म
नीं जें चिंतिलें निर्फळ होय. याची खूण तुझे पाठवर झाड असे.

१३४ या प्रश्नाचें फळ तुझा दुर्जन असे त्यासीं जिंकिशील. राज द्वारीं किंवा

पोठेग्रहस्थास लाभ होईल· दक्षिणकिंवा पूर्वदिशांहून लाभ असे· मनइच्छा कार्यसिद्धी होईल· तुझे नष्टदिवस गेले असत आतां दिवस बहुत बरे आलेअसत· कुळदेवतेची पूजा कीजे तेणें करून शत्रूचा नाश होईल· याची खूण तुझे भुजेवर तीळ असे·

१४१ या प्रश्नाचें फळ मध्यम व्यापार वस्तूविषयीं बहुत लाभ असे· शुभ कार्य होईल· विवाह लाभ होईल· शत्रूनाश होईल· राजमान्य होईल· बहुत लाभ होईल· याची खूण तुझा स्त्रीसीं कज्जा असे·

१४२ या प्रश्नाचें फळ शुभ कार्य असे· द्रव्यलाभ होईल· मनीं चिंता असे· ती दूर होईल· इष्ट बंधूची प्रीती होईल· स्नेह्याची भेट होय· मनीं संतोष ठेवणें जीवस्तू घेतली त्यांतच लाभ होय· जीवस्तू हातांतून गेली ती येईल· राजद्वारीं सन्मान होईल· याची खूण तुझें कोणासीं घेणें नाहीं· सत्य जाण· मनोरथ पूर्ण होईल·

१४३ या प्रश्नाचें फळ कांहीं कार्यसिद्धी होईल· श्री भवानीचें पूजन करावें मागील कार्य करावें तें होईल· कन्यालाभ लक्ष्मी लाभ होईल· व्यापारांत लाभ होईल· शरीराचा रोग जाय· तुझा शत्रू एक तोंडीं बोलतो त्याचा विश्वास धरू नको· त्याणें मागें तुला दगा दिल्हा असे· तूं सावध राहाणें त्याची खूण तुझे उजवे बाजूवर तीळ असे·

१४४ हा प्रश्न बरवा असे· संपदा प्राप्त होईल· मन कामना सिद्धी होय· द्रव्यलाभ होईल· आपदा संकट दूर होईल· कुळदेवतास मोर पाहील आतां ग्रह तुला बरे असत शत्रूची चिंता नाहीं याची खूण तुझे डोळे मोठे आहेत·

२११ हा प्रश्न बहुत चांगला असे· कार्य मोठें परंतु सिद्धी असे· घरामध्यें तुला जय असे· आतां तुजला बहुत सुख होईल· धंद्यांत नफा होईल· पुत्रलाभ होईल· याची खूण तुझे बायको कडून कज्जा असे· मित्र बंधू यांची भेट होईल·

२१२ या प्रश्नाचें फळ मांगलीक याचे होईल· द्रव्य लाभ होईल· पुत्रलाभ धनलाभ, चतुष्पद लाभ होईल· प्रवासीं जायाचें करतोस प्रवास परगांवाचें का

यांची चिंता असे, कुळदेवतेनें, व आराध्यदेवतेनें कार्यसिद्धी होईल. सहोदरसां गे त्याची खूण तुझे घरांत स्त्रीवर दहशत असे.

२१३ या प्रश्नाचें फळ तुजला जीवाची चिंता असेल ती दूर होईल अन्नधनाचा लाभ होईल. मनांत खुशाल असो देणें एक महिन्यांत तुझी कार्यसिद्धी होईल, बंधू भेटेल कुटुंबसुख असे शरीरीं सुख होईल, उत्तम पदवी प्राप्त होईल शत्रू एक असे त्याचा नाश होय तुला दिवस बरे आले असत याची खूण तुझे वडिलांला द्रव्य फार होतें.

२१४ या प्रश्नाचें फळ तुला बहुत उतावळीनें लाभ होईल. जी वस्तू जिकडून गेली असेल ती वस्तू माघारी हातीं येईल. दुरींहून एक लाभ होईल. मोठी मनांत एक चिंता असे ती दूर होय द्रव्य लाभ होईल. शत्रू एक असे त्याचा विश्वास धरूं नको. कुळदेवतेची पूजा कीजे ऊंस दान दीजे बरें असे याची निशाणी मागें एक घाला असे.

२२१ या प्रश्नाचें फळ ऐकावें, वर्षे तीन झालीं सुख असे आतांचे नवें वर्षापासून तीन वर्षे सुख असे मोठी पोटीं चिंता असे ती चिंता चंचळ असे, तुझें आतां दुःख गेलें असे मंगलीक होईल मनोरथ पूर्ण होतील एक वस्तू तूं सोडिलीस ती पुनरपी करावी याची खूण तुजला जळघात गेला असे.

२२२ या प्रश्नाचें फल मध्यम असे मित्रासीं विरोध होईल शत्रूची भेट होय बरवें नाहीं क्लेश प्राप्त होय ज्या कार्याची चिंता मनांत असे तें कार्य मोठें असे द्रव्य हानी होय, शरीरक्लेश उत्पन्न होय, गुप्त चिंता दूर होणार नाहीं याची खूण तुझे भुजेवर तीळ असे.

२२३ या प्रश्नाचें फळ मध्यम असे, तूं कार्य चिंतिलें तें बरवें नाहीं, हें कार्यकरितां लोक निंदा करितील, भावासीं कज्जा उपजेल, धंद्यांत तोटा येईल तरी दुसरें काम करावें. हें कार्य करणें कठीण असे याची खूण रात्री स्वप्नांत खूण पाहिली असे.

२२४ या प्रश्नाचें फळ तुला शत्रूचिंता असे, आपली चिंता नाहीं परंतु तें कार्य शत्रूचा विलंब असे. घरांत कज्जा तेणें असे परंतु तूं आतां खातरज

श्रा ठेवकीं, बरें होईल वाईटदिवस गेले असत तुला बरेदिवस आले असत देवगुरूची भक्ती कीजे, तेणेंकरून कार्यसिद्धी होईल. याची खूण तुझेडा वे बाजूवर तीळ असे.

२३१ या प्रश्नाचें फळ मांगलिक असे कार्यदिसेल. एक मासांत पुत्र लाभ व द्रव्य लाभ होईल शत्रूचिंता तुला असेती दूर होईल. व्यापारांत लाभ-होईल. याची खूण शत्रू येऊन पांयां पडतील.

२३२ या प्रश्नाचें फळ तुला मध्यम असे कार्य चिंतिलें नष्ट असे, तें होणा रनाहीं मनांत भयउपजेल कुटुंब क्लेशउत्पन्न होईल याकरितां दुसरें कार्य करावें तेणेंकरून तसे शरीरास क्लेश होतील, द्रव्य हानी होईल, शत्रूसींक लह होईल, याकरितां धर्म करावा तेणें खुशाल होय याची खूण देहीं पश्चा त्ताप होय.

२३३ या प्रश्नाचें फळ तुला अकल्पित फल प्राप्त होईल परंतु चिंता मनांत अनर्थ कार्य योजिलें असे जें कार्य करणें तें विचार करून कीजे, याकरितां दुसरें कार्य कीजे, तेणें तुझी कार्य सिद्धी होईल. याची खूण तुझे स्त्रीसीं तु झा कज्जा असे.

२३४ या प्रश्नाचें फळ तुझी कार्यसिद्धी होईल कुटुंब क्लेश दूर होय गुप्त गोष्ट सांगतां लोक हसतील तुझे नष्ट दिवस गेले आजबरें असे. धनलाभ चतुष्पद लाभ होईल दुःख जाईल सुख यश होय याची खूण तुझे जवळ मागें द्रव्य होतें.

२४१ या प्रश्नाचें फळ तुजला लाभ असे विवाहस्त्रीची चिंता असे प्रवास परगांवाची चिंता असे ती सर्व दूर होईल. कुटुंबाची चिंता असे, कुटुंबाची वृद्धी असे, पिता बंधू तुला भेटतील. एक मनुष्य तुझे जातीचा हेवा करितोस तें दूर करील. याची खूण तुझे स्त्रीचे पोटावर तीळ असे.

२४२ या प्रश्नाचें फळ तुजला दुप्पट लाभ असे मनोरथ पूर्ण होईल. चिंति लीवस्तू प्राप्त होईल. दुसमानाची खराबी होईल. एका मनुष्या पासून चिंति लीवस्तू प्राप्त होईल याची खूण तुझे उजवे भुजेवर तीळ असे.

२४३ या प्रश्नाचें फळ तुझे शरीरास बरें सुख होय सुखाचे दिवस आले असत मनोरथ पूर्ण होतील द्रव्य लाभ घडेल क्लेश दूर होतील एकवेळ मोठा लाभ असे पुत्रसुख होय दुसमानाचें वाईट होय याची खूण तुझे उजवे कुशी वर तील असे·

२४४ या प्रश्नाचें फळ धर्मसेवा करशील तेणेंकरून कार्य सिद्धी, तुझे नष्टचर्येचे दिवस गेले असत मनात संतोष ठेवणें एकमनुष्यानें तुझें कार्य बिघडलें असे त्याचा विश्वास धरूनको· पुत्र सुखी होय याची खूण तुझे इंद्रिया वर तीळ असे·

३११ या प्रश्नाचें फळ बरें असे तुला मोठी चिंता असे जीवांची चिंता असे· ती दूर होईल आपल्या कुळदेवतेची पूजा कीजे तेणें मनकामना पूर्ण होय· शत्रू मिटेल राजदरबारीं सन्मान होय लाभ होय याची निशाणी तुला क्रोध फार कठीण येत असेल·

३१२ या प्रश्नाचें फळ मनकामना पूर्ण होय द्रव्यलाभ, कुटुंब लाभ, वृद्धी लाभ होय शरीर निरोगी होय बहुतदिवसांची चिंतारोग दूर होय मनी संतोषपणानें व्यापार करितो· ज्या कार्याची चिंता करितोस तें कार्य सिद्धी होय याची खूण तुझी स्त्रीसीं बहुत प्रीती असे·

३१३ या प्रश्नाचें फळ द्रव्यचिंता तुला बहुत असे तेणें तुझें कल्याण एक वेळ कार्य करितां चिंता असे मग बरें होईल· याची खूण स्वप्नांत अलंजंजाल आलें असे·

३१४ या प्रश्नाचें फळ शुभ कल्याण होईल द्रव्य लाभ होईल सर्व कार्यसिद्धी होईल· मनांत संतोष असों देणें तूं मनांत धार्मिक आहेस मनांत चिंता तूं नकीजे, उपकारी असे याप्रमाणें बरें असे याचीखूण तुझें धन गुप्त असे· ज्यास्तीनसो

३२१ या प्रश्नाचें फळ तुझ्या मनांत चिंता असे तें बरें नाहीं, बरें करितां वाईट होय कार्यसिद्धी होणार नाहीं, याजकरितां दुसरें कार्य करावें· हें कार्य करितां दुःख होय क्लेश होय द्रव्य हानी होय मास एक चिंता होय याची खूण, तुझें

कोणासीं बरे पण नाहीं.

३२२ या प्रश्नाचें फळ तुला असे मनांत चिंता दूर होय यंदा तुला भावा कडून व मित्राकडून खुशाली होईल शरीर शांत होईल द्रव्यलाभ यंदांचे वर्षात विशेष होईल राजद्वाराहून खुशाली होईल उत्तम फल प्राप्त होय शत्रूकडून लाभ होय याची खूण तुझे मस्तकीं चाई असे.

३२३ या प्रश्नाचें फल तुला सफल यंदांचे व्यापारांत लाभ असे शेत करीतां लाभ असे वत्सामध्यें यश येईल उद्योग होईल गुप्तचिंता मनांत असे ती दूर होय धर्म कीजे कार्यसिद्धी होय शत्रू पायां पडतील याची खूण तुझे इंद्रियास रोग असे.

३२४ या प्रश्नाचें फळ तूं मनीं विचार करितोस परंतु तुझ्या कार्याचा बिघड असे याकरितां तूं श्रीगणपतीचें आराधन कर पूजन कर तेणें तुझें विघ्न दूर होईल, इच्छिलें कार्य २१ घटकेंत व एकवीस दिवसांत होईल निश्चय जाणिजे याची खूण तुझ्या डोळ्यास उपद्रव असे.

३३१ या प्रश्नाचें फळ मांगलिक असे मनकामना सिद्ध, मनांत संतोष ठेवणें तुझे मनीं धर्म असे तेणें तुझी कार्यसिद्धी होईल. कुळदेवतेची पूजा कीजे तेणें करून तुझें बरवें होईल याची खूण तुझे उजवे भुजेवर तीळ असे.

३३२ या प्रश्नाचें फळ तूं मनीं काम चिंतिलें ते होणार नाहीं दुसऱ्या कार्याची योजना कीजे तुला दिवस अद्यापी वाईट आहेत मित्र शत्रू झाले असत दोन तीन वर्षे मनांत फार उच्चार असे तूं मनात भोळा असे तूं मोठा धीर ठेव बरवें होईल याची खूण तुझे छातीवर तीळ असे.

३३३ या प्रश्नाचें फळ तूं मनी कार्य चिंतिलें सतें लाभदायक असे, चांगलें होईल चिंता करूं नको एका मनुष्यापासून व शत्रुपुत्रापासून लाभ होय कुळदेवतेची पूजा कीजे एक गुप्त चिंता असे ती दूर होय याची खूण तुझे जंघेवर तीळ असे.

३३४ या प्रश्नाचें फळ तुझें बरें असे मनोरथ पूर्ण होतील अकल्पित लाभ होय, गेला धंदा येईल मित्र शत्रूपासून लाभ होईल बंधुलाभ होईल दुःख जाय

स्रख होय हेंकार्य बरें योजिलें असे पुत्रलाभ असे दुसमानाचा नाश होय शरीर थंड राहील चतुष्पद लाभ होय याचीखूण तुझें स्त्रीसी बनत नाहीं.

३४१ या प्रश्नाचें फळ तुला बहुत दिवसांची चिंता असे गुप्त चिंता असेती दूर होय स्रख होय स्नेहाची प्रीत होय याची खूण तुला कोणासीं लेणें नाहीं.

३४२ या प्रश्नाचें फळ तुझ्या मनांत जिवाची चिंता असेती दूर होय स्थाईक लाभ होय. द्रव्यलाभ होय. मनांत चिंता असेलती दूर होय. जीवस्तू हातांतून गेली असेल ती प्राप्त होय ज्यासीं स्नेह तुटला असेल तो स्नेह पुनः होय अकस्मित खुशाली होय याची खूण तुझे इंद्रियावर तीळ असे.

३४३ या प्रश्नाचें फळ मध्यम असे. चोरी लबाडीच्या गोष्टी असत मनांत क्लेश होय मनांतून वस्तू गेली असेती हातीं येणें कठीण त्याकरितां धर्म कीजे बरें होय याची खूण तुझे घरांत द्रव्य फार होय.

३४४ या प्रश्नाचें फळ लाभ असे. व्यापारांत लाभ असे. प्रीती वृद्धी असे. क्लेश चिंता दूर होय. स्त्री स्रख होय तुझा एक ठिकाणीं बिघड असे तो दूर होय. शत्रूनाश होय याची निशाणी तुझें शेजाऱ्यासीं बरें नाहीं.

४११ या प्रश्नाचें फळ मध्यम असे. धन हानी असे शरीरीं पीडा असे मनास भय होय बसणें स्थान निर्फळ होय द्रव्य हातीं येणें तें जाईल आतां मनांत चिंता करूं नको. मांगलीक लाभ होईल द्रव्य लाभ होईल कल्याण होईल याची खूण तुझे उजवे बाजूवर तीळ असे.

४१२ या प्रश्नाचें फळ तुला स्त्री पुत्रांची चिंता असे व द्रव्याची कांहीं चिंता असे ती चिंता थोडे दिवसांत दूर होईल मित्र येऊन पांयां पडतील तें काम बंदो बस्ताचें होय याची निशाणी तुझे मित्र भाऊ यांसीं लेणें.

४१३ या प्रश्नाचें फळ तुला द्रव्याची चिंता असेती दूर होय थोरपणा वाढेल राजसन्मान होईल परगांव परदेशाची कार्य सिद्धी होईल स्त्री चिंता असेती दूर होय. गत वस्तू प्राप्त होय मनोरथ सिद्ध होय याची खूण तुझी वायको लबाड

४१४ या प्रश्नाचें फळ मध्यम असे प्रथम चिंता होय मग खुशाली होय देणें असे ती एक महिन्यात चिंता दूर होय. घरांत लाभ होय शरीर प्राधान्य होय

मनोरथ पूर्ण होय याची खूण तुझे खातीवर तीळ असे.

४२१ या प्रश्नाचें फळ तुला स्थाईक चिंता होय द्रव्य लाभ होईल मित्रला भ होईल स्त्री मित्र चिंता असेती दूर होय आतां दिवस तुजला बरे आले असत याची खूण तुझे शरीरीं गुप्त रोग असे.

४२२. या प्रश्नाचें फळ शरीरीं सुख नाहीं द्रव्य हानी झाली असे स्त्रीचें फ्रख झालें असे. याकरितां करणेंतें विचारें करावें फ्रख द्रव्य लाभ कुळदेवतेची पूजा कीजे विश्वास ठेव आपण जें करणें तें समजून करावें. याची खूण तुझे योनी वरतीळ असे.

४२३ या प्रश्नाचें फळ तुझे शत्रूचा नाश होय लाभ होईल संपदा प्राप्त होय सज्जनाचा लाभ जशी गाईची सेवा करावी तेणें कार्य सिद्धी होईल. तुझे वाईट दिवस गेले हें असत्य नव्हे सत्य जाणावें याची खूण तुझे स्त्रीचे योनीवर रोग असे.

४२४ या प्रश्नाचें फळ तुला चिंता असे तुला दिवस फार झाले कार्य मोठें असे विलंबें करून कार्य सिद्धी उतावळीनें कार्य बिघडेल मनांत विश्वास ठेव दिवसें दिवस तुला खुशाली असे याची खूण तुला फ्रख नाहीं.

४३१ या प्रश्नाचें फळ मनाचा मनोरथ फळेल स्थाईक चिंता असेती दूर होय तुझें दुःख सरलें अशुभ दिवस गेले. चांगले दिवस आले. आनंद द्रव्य लाभ होईल शरीरीं बरें असे याची खूण तुझे शत्रूवर तीळ असे.

४३२. या प्रश्नाचें फळ तुला बहुत वाईट असे. तुझे मित्रादिक दुःख देतील बरें करितां वाईट असे. गणपतीस शरण जावें म्हणजे आरोग्य होय याची खूण तुझे स्त्रीला परपुरुष मिळाला असे.

४३३ या प्रश्नाचें फळ तुझे यजमानासीं कज्जा होय तुझी चाकरी व्यर्थ जाय त्या यजमाना पासून तुझा नाश आहे तो झाल्यावर मग तुला एक लाभ होईल तेणें करून तुला द्रव्य विपुल होईल याची खूण तुझे डोकीवर भोंवरे तीन असत.

४३४ या प्रश्नाचें फळ तुझे मनाचे मनोरथ पूर्ण होतील तूं उंचनीच फार पाहातोस तूं चिंता करूं नको. खुशाली होय श्री देवगुरूचे कृपेनें मनचे मनोरथ पूर्ण

होतील याची खूण तुझी स्त्री फारशहाणी असे तुला ते लांछन असे.

४४१ या प्रश्नाचें फळ भावास पीडा होय क्लेश होय पोटांत तुझ्या पीडा असे. ग्रह तुला मध्यम असत पांच रात्री धीर ठेवणें खरें काम करावें कार्य पडणें मुख्य लाभ असे आनां वस्तू तुझे हातून गेलीती बहुत प्रयत्ने येईल त्याची खूण तुझे इंद्रियावर तीळ असे.

४४२ या प्रश्नाचें फळ हा प्रश्न धर्माचा असे तुझें कार्य धर्मातून होईल परंतु इकडे काम आजपावेतो निर्मळ झालें असे. द्रव्य हानी फार झाली असे. दुसरें कार्य करालतर होईल. शरीरास बरें नाहीं याची खूण तुझे स्त्रीचे जंघेवर तीळ असे.

४४३ या प्रश्नाचें फल कार्य होणार नाहीं, द्रव्य हानी होय आपल्यांत विरुद्ध होय जीवास मोठी चिंता असेती दूर होय, सावधरा हावें दुसरें कार्य करशील तर. लाभ होईल याकरितां विचार करून कार्य करावें. ग्रहांची पूजा करावी. तेणें क्लेश दूर होय याची खूण तुझे इंद्रियावर तीळ असे.

४४४ या प्रश्नाचें फल कार्यतूं विचारिलेंतें सिद्ध होय द्रव्य लाभ होय. स्त्री-पुत्राचें सुख होय गेली वस्तू हातीं येइल २१ दिवस १ मास, एकपक्ष, तीन वर्षे पर्यंत बहुत सुख असे शत्रू पायां पडतील. व्यापारांत लाभ होईल. राजदरबारीं सुख होय तूं मनांत संतोष ठेवणें याची खूण तुझे इंद्रियावर तीळ असे.

इतिगर्गाचार्यकृत प्रश्नावळी समाप्त:



अथगर्भकांड गर्भावळी प्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥प्रथमनमूंगौरीचाकुमरू॥ त्रिभुवनीं त्याचाप्रकाशथोरू॥ तोचवरदाविद्यांचासागरू॥ रंगणासीआला॥१॥ मगनमूं आद्य सरस्वती॥ अंबेतुझाशरणागतदुःखी॥ बैसोनिपुण्याचेपालखीं॥ आतांलवकरीयेईमाते॥२॥ मगनमूं संतगुरुनिधान॥ कीस्वामीमज द्यावेंज्ञान॥ येथूनिगर्भावळी गाईन॥ कथामूळ मांडणी॥३॥ ऐका गर्भ कांडींचीमात॥ विरळाजाणती याचाअर्थ॥ येरांपडलीअसेभ्रांत॥ नपडेचीठाईं॥४॥ प्रथम कामकामिनी प्रवर्तोनी॥ पुढती कर जोडोनी॥ प्रश्नकरीतसेभवानी॥ विनवीतसेशंकरातें॥५॥ पिंडामध्येंपिंडरचियेला॥ तोसांगाजीस्वामीवहिला॥ दोनीकरजोडूनिशंकराला॥ पार्वतीपुसतसे॥६॥ मग बोलेजाश्वनीळ॥ येथूनसांगेनगर्भावळ॥ पार्वती येऊनियांजवळ॥ ऐकतीजाहली॥७॥ ऋतूकालस्त्रियांसीआला॥ पुरुष ब्रह्मांडीं मदन चेतला॥ कैसाएक ईश्वरस्वर्गीला॥ उतरोनियां॥८॥ मदनअसेब्रह्मनळीं॥ तोसंचरलागर्भकमळीं॥ निर्गुणनिश्चळतयेवेळीं॥ कैसाजाहलाजीवन॥९॥ येथूनरचनापिंडाचीसहज॥ कमळांतपडिलारज॥ रजाचे होतीगज॥ तुह्मीसतेज ऐकावेंपिंडज्ञान॥१०॥ पहिले मासीभरलेंकमळ॥ दुसरेमासीआपनिर्मळ॥ हेंतुह्मींजाणासकळ॥ चित्त देउनी॥११॥ तिसरेमासीघर॥ तरीतेंरक्तबिंदूचेंखोट॥ चवथेमासीआपणनीट॥ फुटती अंकुर॥ १२॥ ऐसे झालेपांच मास॥ तेव्हांगर्भा आले प्रकाश॥ सहावे मासीपंचतत्वांचाअंश॥ येथूनिजाहलाअसे॥१३॥ तैंपासुनीशरीरांत॥ काया चालटलीजालीजोत॥ सातवे मासीसप्तधात॥ आठवेमासीअष्टांग॥१४॥ शंकरसांगे गिरिजेसी ऐक॥ नववेमासीसंपूर्णजाहले केंशनख॥ उपजतांस्वरूपसुरेख॥ आलेंजन्मासी॥१५॥ मगशंकर ह्मणे वो शक्ती॥ बाळपडिलेंमहीवरुती॥ मातेचियास्तनाप्रती॥ दुग्धयेतेंकैसेंनिपैं॥१६॥ हातीं होती पीयूषिणी॥ पहाकैसीकेली करणी॥ हेंसांगतों तुजकारणी॥ जाणगौरी तूं॥१७॥ तेदेहामध्येंचवदाचक्रें॥ जेकेलींजगदीश्वरें॥ तींतुह्मींओळखावीं चतुरें॥ देउनीचित्त॥१८॥ एक ह्मणती पिंड॥ एक ह्मणती पाखांड॥ ज्याणें पाहिलें वाचोनिगर्भकांड॥ ठाउकें असे त्यालाची॥

१९॥ यादेहामाजी देहीचझाली॥ आर्धीकोणनी वस्तू आकारिली॥ सूज्ञजाण तील तात्काळीं॥ महाराजते॥ २०॥ यादेहामाजी अधिकारशिरक मळ॥ श्रोतेजाण तीसकळ॥ सवाहान हाडसबळ॥ याब्रह्मांडाचें॥ २१॥ मगपार्वतीविनवीशंकरा॥ स्वामीचित्तद्यावें माझियाउत्तरा॥ हाडेंकोणाचियाआकारा॥ हेंसांगिजेस्वामियां॥२२॥ रक्तरेतनाडीत्वचाविकार॥ त्याजपासुनी झाले साचार॥ तेकैसे मजसांगा सत्वर॥ दोन्हींउत्तरें पुसतेंतुह्मा॥ २३॥ नादबिंदु हाडबापाचें॥ अंशरक्तनाडीत्वचांचें॥ विस्तारगुण मातेचे॥ ऐसेंनिर्मिलेंशरीर॥ २४॥ सवाहात हाडमस्तकीं॥ चारश्रवणींतीननाशिकीं॥ आणिक बत्तीसआहेत मुखीं॥ विस्तारपैं याचाअसे॥ २५॥ दोनआहेतहनुवटीं॥ आणिकअठराकंठीं॥ ऐसेंजगजेठीं॥ गोरीपतीसांगीतलें॥ ॥२६॥ दोहींकरींहाडेंबेचाळिस॥ चतुरश्रोतीं आणावेंमनास॥ शंकरसांगेगोरीस॥ जवळीबैसोनियां॥ २७॥ एकवीस मनगटीं आहेतत्याचेमणी॥ सोळापाकोळ्यापाहेंतूं मोजुनी॥ ऐकचित्तदेउनी॥ गिरिजे तूं॥ २८॥ आणिकवीस हाडें आहेतउरस्थानीं॥ गुह्यस्थानीचौंडपन्नी॥ अठ्ठेचाळीस हाडें आहेत दोनीचरणी॥ गोरीऐकतूं॥ २९॥ येथूनदोनशेंजाहलींपुरीं॥ सोळा हाडें अवधारीं॥ ऐके तूंसाचारी॥ स्वाधिष्ठानी॥ ३०॥ मनपुरीपाहाडेंबारा॥ विशुद्धीस अठराआणामनास॥ हिशेबकरुनीगणितांत्यास॥ आणिक मानसीं॥ ३१॥ हृदळीं आहेततेरा॥ येथुनीतिसीझालींचतुरा॥ तरीतूंऐकगुरुकुमरा॥ गुरूचियाखुणा॥ ३२ शंकरसांगतसेगिरिजे॥ तरीऐक हो भाजे॥ सांधासंधी बैसल्ये वोजे॥ तरीतूंऐकावें सादर॥ ३३॥ बाहात्तरकोटीविस्तारिलेंतुज॥ चवदाचक्रांची माळवोज॥ वोवुनीबैसला ब्रह्मा करीतपूजा॥ तेथेंजपहोती मजपें॥ ३४॥ दहावे द्वारीनदिसेपवन॥ गोरीतूंऐकहोचित्तदेउन॥ आणिकपंचायशी पवन॥ ऐक होगिरिजे॥ ३५॥ ब्रह्मांडीनोनाडीतीन॥ बाहात्तर सहस्र फाटकजन॥ तीनशेंसाठ बंददेउन॥ बांकेला असेजडजडीं॥ ३६॥ अंधस्वादिरक्षण॥ नेत्रपुरीअनुहानजाण॥ विशुद्दीदळभरोनीरक्षण॥ ऐसेंसहस्रदळावरी॥ ३७॥ त्रिकुटगोल्हाटसराराऔटपीठ,महारुद्रघन वट प्रकाशजालानीट॥ मगपार्वतीयेउनीधीट॥ शंकराप्रती बोलतसे॥ ३८॥ काळेंसांवळेंकोणेगुणें॥ गोरेंजन्मलें कोणापासुनी॥ मुकेंबहिरेंको

कोणगुणें॥ पांगळे कोणापासुनी झालें॥ ३९॥ खुजें कुरें कांबुरें॥ हें कोणे गुणें साचारे॥ आळसी जन्मलें निर्धारीं॥ हें कोणापासुनी तें सांगा॥ ४०॥ कन्या पुत्र एक बीजें॥ नपूंसक जन्मलें कैसें वोजें॥ आतां शंकरें येवदें गुज॥ मज सांगोनि द्यावें॥ ४१॥ एकेकाचें एक गोत॥ स्वामी उघडावें गौरवा॥ एवढें सांकडें सदाशिवा॥ दूर करावें जी॥ ४२॥ सवाशें वर्षांची हयात॥ एक जाती शंभर नव्वद होत॥ एक ऐंसी सत्तर साठ पंधरा सात॥ चाळीस तीस सर्वांस दहा वर्षांत जिवें जाती॥ ४३॥ नंव्हां आणिक पुसे पार्वती॥ करजोडोनी करी विनंती॥ एक सौभाग्य होती एक भीक मागती॥ मोळी विकोनियां॥ ४४॥ एक झालेत स्त्रीपती॥ एक राजयोगी होती॥ एक महारोगी रक्तपिती॥ तें मज प्रती सांगावें॥ ४५॥ शंकर सांगे निवाडा॥ एकाग्र सोंवळ्याचा झाडा॥ ऋतू देतां स्त्रियेला॥ बहु गुणवंत॥ ४६॥ ऋतु देतां सुंदरी॥ शंका मनीं वाहे सर्व शरीरीं॥ तेथें नपूंसक सुंदरी॥ येणेंचि गुणें॥ ४७॥ पुरुषाचें रेत उगें एक रजें॥ तेथें कन्या जन्मली वोजें॥ शंकर सांगे गोरीस गुज॥ सिद्धांत मातु॥ ४८॥ पुरुष उठे रेत देउनी॥ स्त्री निजे जरी उताणी॥ तेथें बाळकें जन्मती दोन्ही॥ तिच्या पिंडांत॥ ४९॥ सत्वगुणें रमत हर्षाचारें॥ तेथें बाळक जन्मलें गोरें॥ तमोगुणें रमत अहंकारें॥ तेणें लेंकरूं काळें जाणा॥ ५०॥ रजोगुणें रमती साचारें॥ तेथें सावळीं होतील लेंकुरें॥ ऋतू देतां चंचळ घावरें॥ तेथें वेडें कांपरें जाणा॥ ५१॥ येक रमती धरूनी अबोला॥ तेथें मुका गर्भ जाहला॥ शंकर सांगे गोरीला॥ ऐक तूं सावधपणें॥ ५२॥ एक रमती झांकूनि डोळे॥ ते गर्भींच झाले आंधळे॥ ऐसें सांगीतलें जास्वनीळें॥ गोरीप्रती॥ ५३॥ एक रमती घूर्मीत निज करें॥ तेथें लेंकरूं होय बहिरें॥ ऐसें सांगीतलें शंकरें॥ दुर्गे लागुनी॥ ५४॥ एक रमती कपाळा आंठी॥ तेथें जन्मती नकटीं॥ दहा हाडें कपाळीं लहारीं॥ ऐसें जाण सत्यपें॥ ५५॥ ऋतू देतां स्त्रियेलागीं॥ काय होतें गर्भा आंगीं॥ शंकर ह्मणे गोरी वेगीं॥ ऐक चित्त देउनी॥ ५६॥ उष्ण पाणी पाप्रा पियेघटघडी॥ तेथें महा होय धाडी॥ ऊन ऊन जेवी तांतडी॥ तेणें खुजें होय॥ ५७॥ गर्भिणी असतां हिंडे घरोघरीं॥ होती तेथें पांगुळे निर्धारीं॥ पाल्व आणि यामें थूनकरी॥ तेथें रक्तपिती होय जाणा॥ ५८॥ शंकर सांगे गिरिजेस॥ च्यार प्रहर बारा तास॥ आरंभ देव महेशा॥ सांगता जाहला॥ ५९॥ पहिले तारीं दीधला ऋतु॥ तरी


ऐकावेंसावधचित्तु॥ तेणेंसवाशेंवर्षें हयातु ॥पुरुषालागोनी॥ ६०॥दुसरेतासीं पडेमैथुन॥ तेणें शंभरवर्षेंपूर्ण ॥ आपणजगज्जीवन॥ वदताझाला ॥ ६१॥तिस रेतासींमैथूनकरी॥ तेथेंनवदवर्षेंनिर्धारी॥ शंकरह्मणेवागोरी ॥चित्तदेईमाझि याबोला॥ ६२॥ चौथेंतासीं अनायासें मिळती॥ तेथें हयातऐसीं वर्षें होती॥ शंक रह्मणेगोरीप्रती॥ एकचित्तेंपरिसीजे ॥ ६३॥ ऋतूदीधलापांचवेतासीं॥ सत्तर् वर्षें हयातत्यासीं॥ सहावेतासींनिश्चयेसीं॥ तेथेंसाठवर्षेंपैं ॥६४॥ सातवेता सींदोघेंमिळती॥ पन्नासवर्षें हयातत्यांप्रती॥ शंकरसांगे गोरीप्रती॥ एकचित्तक रुनीपरिसीजे॥ ६५॥आठवेतासाचीगणती॥ चाळीसवर्षेंनिश्चिती॥ पूर्णहोतां चीमरणपावती॥ जाणसत्यपैं॥ ६६॥ ऋतूदीधलानववेतासीं॥ तेथेंतीसवर्षेंनि श्चयेसीं॥ शंकर सांगेगिरिजेसीं॥ सत्यवचनपैं॥ ६७॥ दहावेतासींजाण॥ तेथें वीसवर्षेंनिधान॥ अकरावेतासींमैथुन॥ प्राणीदहावर्षांनीमरेल॥ ६८॥ बारा वेतासीऋतूदीधला॥ तेथेंदहावर्षेंआयुष्यत्याला॥ एकउपजतांचीमेला॥ नाहीं सुखदुःख॥ ६९॥ शंकरह्मणेगिरिजेचित्तदेईं॥ सातवारपंधरातिथीपाहीं॥ या चेगूणसांगन तेही ॥ ऐकलवलाहींशुद्धमनें॥ ७०॥ वारसत्तावीस नक्षत्रें॥ ऐक गिरिजेनिर्धारें॥ तूंएकचतुरे॥ निश्चयरूपें॥ ७१॥ पाडव्याचापंडीतजाहला॥ बिजेचागुणवंतजन्मला॥ तिजेचानष्टभला॥ तोपरद्वारी॥ ७२॥ ऐकचवथीचा अहंकारी॥ पंचमीचापरोपकारी॥ षष्ठीचासत्वधारी॥ सप्तमीचाभिकारीजन्म ला॥ ७३॥ अष्टमीचादरिद्रीआलाजन्मासीं॥ नवमीचाभोळाआलाजन्मासी॥ पुढेंसांगेनअनायासीं॥ ऐकगोरीतूं॥ ७४॥ दशमीचाभावीकजाण॥ एकादशी चाजाणगुण॥ द्वादशीचाचतुरशहाणा॥ ज्ञानकरी॥ ७५॥ त्रयोदशीचाजगमैत्र ॥चतुर्दशीचाशूर॥ अमावास्येचापोर्णिमेचानिस्कर॥ महंतजाणतूं॥ ७६॥ जया लागीसकवेळतोकवीश्वर॥ सुशब्दबोलेनिर्मळ॥ कवित्वकरीरसाळ॥ तोकवीश्वर जाणा ॥ ७७॥ जयासीकुवेळलागली॥ सदांनित्यवाहेमोळी॥ नित्यहिंडेचारवेळीं ॥ तेणेंतिथीवारें॥ ७८॥ जयासीकुबुद्धीवेळलागली॥ कुबुद्धीतयासींसंचरली ॥ त्याचीफटफजीतीजाहली॥ हांसतीलल्हानथोर॥ ७९॥ जयासीलागलीचं चळवेळ॥ तेथेंजन्मलेवेडेपांगुळ॥ तेजन्मासियेऊनीनिर्फळ॥ संसारींव्यर्थजाणा

॥८०॥ जोलाभवेळेवरीजन्मला॥ येरीवेळचांगलीलाधला॥ तोध्रुवबैसला॥ अ
ढळपदींसत्वर॥८१॥ अमृतवेळालाधलीज्याला॥ तोयोगीसाधूसंतझाला॥ काळ
वेळलागलीजयाला॥ तोप्रत्यक्षमैंदजाणा॥८२॥ रुवेळालागलीजयाला॥ तोगू
पासांगतोंतुजला॥ त्यासींसद्गुरूभेटला॥ अनंतलोचन॥८३॥ जयासीं लागलीवे
ळचोर॥ तोघेईभलत्याचेंघर॥ धरूनघालती रुळावर॥ त्याची मारती गरदन॥८४
रोगवेळीं होयरोगी॥ दुःखतिडका त्याचेअंगीं॥ कायानाहींनिरोगी॥ कायाहीन
॥८५॥ जयासीलागली मृत्यूवेळ॥ तोउपजतांची पावलाकाळ॥ पार्वतीससांगेजा
श्वनीळ॥ प्रेमादरें॥८६॥ जोभलतेकुयोगींजाहला॥ तो अधः पातासींगेला॥ शंकर
ह्मणेगोरीला॥ चित्तदेईमाझ्याबोला॥८७॥ प्रथमन्हाणआलेंतोदिवसआदितवार
॥ तरीतीविधवाहोईलनार॥ प्रथमन्हाणआलेंतोदिवस सोमवार॥ तरीती वांझ-
नारजाणावी॥८८॥ प्रथमन्हाणआलेतोदिवसमंगळवार॥ तीहोय अखंडवांझनार
॥ प्रथमन्हाणआलेतोदिवसबुधवार॥ तीसकन्याफार होतील॥८९॥ गुरुवारींचें फ
ळएक॥ तीमहोतीउदंडलेंक॥ ह्मणोनिशंकरसांगेविवेक॥ तेंकळलेंगिरिजेप्रती॥
९०॥ प्रथमन्हाणआलेंशुक्रवारीं॥ त्यानारीसहोती कन्याकुमरी॥ शंकरह्मणेवोगो
री॥ ऐकचित्तदेउन॥९१॥ शनवारींचें ऐकफळ॥ तीनारमोठीछिनाल॥ भ्रतारअ
सोनियांजवळ॥ चित्तठेवीपरपुरुषावरी॥९२॥ तेव्हांशंकर ह्मणे वोपार्वती॥ ऐक
थानस्त्राची प्रचीती॥ नक्षत्रपडल्याकपाळावरती॥ तोतीसरानयन॥९३॥ न
क्षत्रपडलेंजयाच्याह्रदयावरी॥ तोदरिद्रीवाचेभांडणकरी॥ हातावरीपडेतोचो
रीकरी॥ नक्षत्रपडेभुजेवरी॥ तोक्षत्रीयरणशूर॥९४॥ डोईनक्षत्रपडे गांही॥ तो
सदासर्वकाळमोळीवाही॥ जन्मजरीरुचला होई॥ तरीतयासी छत्रअसे॥९५
नक्षत्रपडेजिव्हेवरी॥ तोपापीअभक्ष्भक्षी नानापरी॥ कळीक्नात्यासींनिर्घा
री॥ चैनकांहींपडेना॥९६॥ नक्षत्रपडेवोंटीसीं॥ कन्याहोतीलत्यासीं॥ नक्षत्र
पडेजंघेसी॥ तोव्यभीचारीहोय॥९७॥ नक्षत्रपडे पायासी॥ तोघरसोडूनजायवे
गासीं॥ एकयोगीझालेतापसी॥ हिंडतीवनोवनी॥९८॥ एकराजकरीती॥ एका-
चीगर्दनमारिती॥ ऐसीकथागिरिजेप्रती॥ शंकरसांगत॥९९॥ ऐसेंमीतुजसां
गीतलें॥ गिरिजे ऐकावेभलें॥ पिंडब्रह्मांडकेवळ॥ आतांनिवांतराहीं॥१००॥

आतांराहोहीकथा॥ सांगेनएककर्मकथा॥स्वस्थकरोनीचित्ता॥आइकीजे॥१०१॥
ज्याणेंसाधूनिंदाकेली॥त्याचीगर्भीवाचागेली॥ज्याणेलरकीचगोवाईदीधली॥ तो-
थोराहोउनीआलाजन्मासी॥१०२॥ ज्याणेवधिलीगायत्नीसी॥ तोआलापांगुळानेज-
न्मासी॥ ज्याणेगोवहत्याकेलीपरियेसी॥ तोघाण्याचाबेलहोय॥१०३॥ दोन्हीनेत्रबां
धिती॥ भोंवतेगरगरांफिरविती॥ एकावरीमहाजाळघालिती॥ तेगोण्याबाहातीबे
लजाणा ॥१०४॥एकाचेंद्रव्यघेउनीबुडविती॥ तेश्वानहोउनीयेती॥ फेडावयातया
घराप्रती॥ सत्यसत्यजाणपां॥१०५॥एकलग्नकरूनस्त्रीससांडिती॥ तोफिरेदेशा
वराप्रती॥ लागतीलिंडक्यात्याप्रती॥ वांयाव्यर्थचडफडती॥१०६॥ज्याणेस्त्रीह
त्याकेली॥ त्यातें बोकडाचेजन्मासघाली॥ पुर्फीजनावरेंमारिलीं॥ तोजन्मांगात्वा
॥१०७॥ज्याणेंकन्येवरीमनसाकेली॥ तो आंधळाजाहलागर्भस्थळीं॥ तोभोग
भोगावयासंसारी॥ आलाअसेजन्मासीं॥१०८॥ एकलरकावेव्हारकरिती॥ तेही
तयाच्याजन्मासयेती॥ तेहीवेडेवाकुडेहोती॥ पहिलेजन्माचीगतीजाणा॥१०९
जोलागलानाहींहरिकीर्तनी॥ तोवेश्येसींगेलामिळोनी॥ एकअतीतासींदुखवो
नी॥ तोहीगेलाअधःपतनीजाणिजे॥११०॥ एकमुकेपणीराहाती॥ तोपडेबंदि-
खान्याप्रती॥ पहिलेजन्मासीपापमती॥ तोपडेनर्ककुंडीं॥१११॥ आतांराहूं द्या-
हीकथा॥ सांगेननारीचीव्यवस्था॥ आतांनारीनांदतीतत्वता॥ कलियुगामाझारी
॥११२॥ सद्भक्तांआदरनकेलातिसीं॥ जिणें दान नकरूं दिल्हें भ्रतारासी॥ ती-
डुकरीचेजन्मासी॥ सत्यआलीजाणपां॥११३॥ जीभ्रताराआधींजेविली॥ तीव-
नींवागुळझाली॥आपुलीविष्टाआपणभक्षिली॥ मूकलागलीयेजन्मासीं॥
११४॥ज्यानारीनेंभ्रतारसेवानाहींकेली॥ तीपिंगळाहोयमोकळी॥ तिचे अं-
गींभगेंपडलीं॥ सर्वांगासी॥११५॥ज्यानारीआपुलेभ्रतारासांडोनी॥ परपुरु
षाळागलीध्यानी॥ तीनारविवसीहोउनी॥ तोंडकाळेंकरूनियां॥११६॥ जिणें
केलापतीचाघात॥ तीबाळरांडहोउनीजन्मत॥ जिच्याशब्दासीनाहीउचित॥
तीकरीदुसरीयांचीनिंदा॥११७॥जिचीवासनानाहींबरवी॥ गणगोतासीकिर
किरकरी॥ हिंडेवनवागुळाचेपरी॥ ऐशारीतीनें॥११८॥ ह्मणोनीवासनाआवरा
वी॥ बहूतांपरीसांभाळावी॥ज्याचीत्याणेसमजावी॥ बहूतप्रकारें॥११९॥ वा

सना आवरिली नाहीं रावणानें ॥ अवघें राज्य गमाविलें त्याणें ॥ परीतो हिंडला क र्मानें ॥ वर्षानु वर्षे जाणपां ॥१२०॥ एकोत्तरशें कौरव जाण ॥ दुर्योधनासी आणिलें उणें ॥ बुडविलें वास नेंनें ॥ नोच्छ कितो सर्वांसीं ॥१२१॥ वामनाधरियेली बळ कट ॥ आपुलें देहा करवतल्यानन्तानीट ॥ कापिन्नलें मद मत्सर उट ॥ वासना हृद कूट्ट नियां ॥१२२॥ गळा नवक महाचक्र वर्ती ॥ आपुल्ले देह घातल्ले शरस्त्रीं ॥ वधिलें अहंकार दुर्मती ॥ मदमत्सर जयानें ॥१२३॥ ऐसें हें गर्भकांड ॥ हें एकतां दोष होय खंड ॥ भवरोगी करूनियां अखंड ॥ आपुल्या पदीं मिळवीतसे ॥१२४॥ इतिश्रीगर्भकांडे ईश्वरपार्वती संवादे संपूर्णमस्तु ॥ ॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥

इतिगर्भकांड गर्भावळी समाप्त. ॥ छ छ ॥



अथ स्फुटज्योतिष प्रारंभः

अमृतसिद्धियोग. - आदित्यवारीं हस्त, गुरुवारीं पुष्य, बुधवारीं अनुराधा, शनिवारीं रोहिणी, सोमवारीं सौम्य म्हणजे मृग. कोणी श्रवणही घेतात, शुक्रवारीं रेवती, मंगळवारी अश्विनी. या वारीं हीं नक्षत्रें आलीं म्हणजे अमृतसिद्धियोग जाणावा.

वर्ज्य अमृतसिद्धियोग. - गुरुवारीं पुष्य नक्षत्र असतां अमृतसिद्धियोग आहे परंतु विवाह म्हणजे लग्न केलें असतां सहा महिन्यांनी उभयतांस मृत्यु

शनिवारीं रोहिणी असतां प्रयाण केलें तर मृत्यु, मंगळवारीं अश्विनी असतां ग्रह प्रवेश केला तर षण्मासांत मृत्यु जाणावा.

मृत्युयोग. - रविवारी अनुराधा, सोमवारीं उत्तराषाढा, मंगळवारीं शततारका, बुधवारीं अश्विनी, गुरुवारीं मृगशिर, शुक्रवारीं आश्लेषा, शनिवारीं हस्त, या वारीं हीं नक्षत्रें आल्यां असतां मृत्यु योग जाणावा तो सर्व कर्मास वर्ज्य करावा.

दग्धयोग. - बुधवारीं तृतीया, मंगळवारी पंचमी, गुरुवारीं षष्ठी, शुक्रवारीं अष्टमी, सोमवारीं एकादशी, शनिवारीं नवमी, रविवारीं द्वादशी या प्रकारें योग आले म्हणजे दग्ध योग जाणावा

यमघंट योग - रविवारीं मघा, सोमवारीं विशाखा, मंगळवारीं आर्द्रा, बुधवारीं मूळ, गुरुवारीं कृत्तिका, शुक्रवारीं अनुराधा, शनिवारीं हस्त, याप्रमाणें योग आला असतां यमघंट योग जाणावा.

योगफल. - यम घंटावर गमन केलें तर मरेल. ग्रहप्रवेश केला तर कुलक्षय होईल. कांहीं देवादिकस्थापना केल्यास मरण होईल. उपजलेलें बालक मरेल असें जाणावें.

प्रयाणास उक्त नक्षत्रें. - अश्विनी, अनुराधा, रेवती, मृग, मूळ, पुनर्वसु, पुष्य, श्रवण, हस्त हीं नक्षत्रें प्रयाण करावयास योग्य जाणावीं.

मृग, अश्विनी, पुष्य, पुनर्वसु, हस्त, अनुराधा, श्रवण, मूळ, धनिष्ठा, रेवती यांवर प्रयाण केलें असतां कार्य करून त्वरित घरीं येईल.

ध्रुवस्थिर नक्षत्रें. - तीन उत्तरा म्हणजे उत्तरा फाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तरभाद्रपदा, रोहीणी, भास्कर म्हणजे सूर्य हीं ध्रुव स्थीर संज्ञक नक्षत्रें जाणावी. यावर घरें, देउळें, अनेक सुखासनें, यांचा आरंभ केल्यानें सुख प्राप्त होईल.

मघा, मृगशिर, हस्त, स्वाती, मूळ, अनुराधा, रोहिणी, रेवती. तीन उत्तरा हीं नक्षत्रें कोणत्याही शुभ कार्याचे आरंभीस, अथवा विवाहास, किंवा कन्यावरणास, अथवा शेतांत बीज पेरण्यास, किंवा कांहीं वस्तू संग्रह कर-

ण्यास, अथवा ग्रहप्रवेश, किंवा ग्राम प्रवेश करण्यास प्रशस्त धरिलीं आहे त असें जाणावें.

चरचलनक्षत्रें.- स्वाती, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका, हीं चर चल संज्ञक नक्षत्रें जाणावीं.

अंधनक्षत्रें- रोहिणी अंध, मृगशीर्ष मंद, आर्द्रा मध्यलोचन, पुनर्वसु सुलोचन, या प्रमाणें अठ्ठावीस नक्षत्रें अभिजित सह गणावीं; तें अभिजित् उत्तराषाढापुढें गणून नंतर श्रवण, धनिष्ठादिक गणावीं. ह्मणजे अठ्ठावीस होतात. याप्रमाणें पहावें.

उग्रक्रूरलघुनक्षत्रें.- मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, भरणी हीं नक्षत्रें उग्र क्रूर, पुष्य, अश्विनी, हस्त, हीं नक्षत्रें लघु क्षिप्र जाणावीं.

ध्रुवस्थिरमृदुमैत्रनक्षत्रें- रोहिणी, तीन उत्तरा, चित्रा, अनुराधा, रेवती, हीं नक्षत्रें ध्रुव स्थीर, मृदुमैत्र जाणावीं.

तीक्ष्णदारुणनक्षत्रें.- आर्द्रा, ज्येष्ठा, मघा, मूळ, आश्लेषा, पूर्वा, हीं नक्षत्रें तीक्ष्ण दारुण संज्ञक होत.

धान्यमर्दनासवार.- रविवारीं अंश १० सोमवारीं १६ बुधवारीं ३ शनिवारीं ८ मंगळवारीं १२ याप्रमाणें धान्य कमी होईल. गुरुवारीं, आणि शुक्रवारीं मळणी काढून धान्य मोजलें असतां भाग जात नाहीं. यास्तव चांगली दिनशुद्धी पाहून मळणी काढावी.

गमनास वर्ज्य नक्षत्रें.- तीन पूर्वा ह्मणजे पूर्वाफाल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, मघा, ज्येष्ठा, भरणी, आपलें जन्मनक्षत्र, कृत्तिका, आश्लेषा स्वाती, विशाखा, चित्रा इतक्या ह्या नक्षत्रीं कधींही गमन करूं नये.

गांवास गेला तो कधी येईल याचा प्रश्न.- शुक्लपक्षींच्या प्रतीपदेपासून वर्तमान तिथी पर्यंत तिथी गणाव्या. आणि सूर्योदयापासून तत्काळ पर्यंत जे प्रहर झाले असतील ते मिळवावे. आणि दिवसनक्षत्रांची संख्या मिळवून रविवार पासून वारांची ही संख्या मिळवावी. त्या एकंदर संख्येला सातानीं भाग देऊन जे अंक राहातील त्यांचा प्रश्न पहावा. एक अंक उरला तर

त्याच ठिकाणीं आहेत. २ उरलेनर फ़रखें करून येतो आहे ३ उरले तर अर्ध मार्गांत आला आहे. ४ उरलेतर आपल्या गांवाचे आस पास नजीक आला आहे ५ अंक राहिलेतर फिरून माघारा गेला. ६ राहिले तर कांहीं आजारा मुळें क्लेश पावत आहे. आणि जर बरोबर भाग तुटला तर येत नाहीं म्हणोन सांगावें.

घबाड मुहूर्त.– सूर्य नक्षत्र म्हणजे महा नक्षत्रापासून दिवस नक्षत्र पर्यंत गणून जी संख्या येईल तिला तिहीनीं गुणावें आणि त्यांत शुक्ल प्रती पदेपासून विद्यमान तिथी पर्यंत तिथी मेळवून एकंदर संख्येस ७ नीं भाग द्यावा. तीन शेष राहिलेनर त्या दिवशीं घबाड मुहूर्त आहे असें जाणावें तें सर्व व्यापारांत योग्य होय.

आडळ भ्रमण.– सूर्य नक्षत्रा पासून दिवस नक्षत्र पावेतों गुणून सातानीं भागावें ३-६ राहिलेतर भ्रमण; २-अथवा० आलेतर अडळ जाणावें. भ्रमण पशु कर्मास आणि अडळ स्थावरास घ्यावें.

चतुष्पद घ्यावयास मुहूर्त. – सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्रा पर्यंत मोजून जी संख्या येईल ती सातांनी भागावी शेष राहील त्याचा क्रम आंत च्यार. बाहेर ३ या प्रमाणें आंत बाहेर चाल पाहून पश्वादिकांचा संग्रह करावा. आंतले चालीवर आणिलें असतां राहील. आणि बाहेर चालीवर आणिलें असतां जाईल असें जाणावें.

शेतांत नागर धरावयास मुहूर्त.– सूर्य नक्षत्रा पासून दिवस नक्षत्र पावेतों गुणून विद्यमान तिथी व वार मिळवून नवांनीं भाग द्यावा आणि शेष अंक ७ राहिलेतर हेंवर म्हणावें हेंवरावर शेतांत नागर जुंपावा.

पालकारोहणास मुहूर्त– सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्र पर्यंत गुणून पूर्वे पासून च्यार दिशांस पांच पांच नक्षत्रें देऊन मध्यें ७ द्यावीं म्हणजे सत्तावीस जाहलीं ज्या दिशेस भाग पुरेल तें फळ पालका रोहणाचें जाणावें.

फळश्लोक.- पूर्व भागीं आरोग्य, दक्षिणेस मरण होय, पश्चिमेस रुग्णा ग, उत्तरेस व्याधी होय, मध्यें आयुष्यान् होय.

मृग, अश्विनी, धनिष्ठा, रेवती, पुष्य, चित्रा, शततारका, अनुराधा, नी-

न्हीउत्तरा, स्वाती, हस्त, हीं नक्षत्रें पालक रोहणाची. यास ग्रहबळ, शुभ ग्रह-गुरु लग्नीं असावा. आणि ३ सहा असे पापग्रह असावे. तर पालकारोहणाग्र हीं धन कनक समृद्धी होईल.

अग्नीकोठेंआहेतो पहाणें - ज्या तिथीस पाहणे त्यातिथी पर्यंत शुक्ल प्रतीपदादि तिथी गणून त्यांत एक अधीक मिळवावा. आणि त्या दिवशीं जोवार असेल तोही त्यांत मिळवून एकंदर संख्येस चहूंनीं भागावें, आणि शेष गुण ह्मणजे तीन व अष्ट ह्मणजे ० असें आले असतां पृथ्वीवर अग्नी आहे असें जाणावें तो होमास योग्य. जर १ किंवा २ राहिले तर आकाशीं व पाताळीं त्यावर होम केला असतां प्राण आणि अर्थ याचा नाश करील.

कोणेग्रहाचेमुखीं आहुती - सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्रा पर्यंत गुणून सूर्या पासून क्रमानें प्रति ग्रहास तीनतीन नक्षत्रें दिल्यानें जेथें भाग पुरेल त्याग्रहाचे मुखीं आहुती आली असे जाणावें.

शुभाशुभफळ. - सूर्य, शनी, राहू, मंगळ, केतु, या पांच ग्रहांचे मुखीं आहुती आली असतां हवन कर्त्यास अकल्याण कारक होय; आणि चंद्र, बुध, गुरु, शुक्र, या चहू ग्रहांचे मुखीं आली असतां उत्तम फळ प्राप्ती होय. ह्मणून-अशा प्रकारे हवन चक्र पाहून अनेक प्रकारचा नैमित्तिक होम केल्यानें सुख प्राप्ती होय.

घातचन्द्रस्य घातवारः - मेष राशीचा घातवार, रविवार, सिंह, कन्या, वृषभ, यांचा शनिवार, मिथुन राशीचा, सोमवार, मकर राशीचा मंगळवार. कर्काचा बुधवार, तूळ कुंभ, याचा गुरुवार, धन वृश्चिक मीन याचा शुक्रवार या प्रमाणे राशींचे घातवार जाणावे

घाततिथी. - धनमीन या दोन राशींची घाततिथी द्वितीया, वृषभ, कुंभ याची चतुर्थी, मेष, कर्क, यांची षष्ठी, कन्या मिथुन यांची अष्टमी, वृश्चिक, सिंह यांची दशमी, मकर, तूळ, यांची द्वादशी. या प्रमाणें घाततिथी जाणाव्या.

घातनक्षत्रे - मेषराशीचें घात नक्षत्र मघा, वृषभ, हस्त, मिथुन स्वाती

कर्क अनुराधा, सिंह मूल कन्या, श्रवण, तूळ शततारका, वृश्चिक रेवती, धन रोहिणी, मकर भरणी, कुंभ आर्द्रा, मीन आश्लेषा, याप्रमाणें घात नक्षत्रें जाणावीं.

घातचंद्र. - मेष १ वृषभ ५ मिथुन ९ कर्क २ सिंह ६ कन्या १० तूळ ३ वृश्चिक ७ धन ४ मकर ८ कुंभ ११ मीन १२ या प्रमाणें ज्या राशी पुढें जो अंक आहे तो त्या राशीचा घातचंद्र जाणावा.

फळ. - हे सांगीतलेले च्यार प्रकारें घाताख्य यांचा दोष कोणे ठिकाणीं पहावा तो प्रकार. (कलह) कज्जा करणें, प्रयाण परदेशीं गमन करणे, राजदर्शनास जाणें, हे एक युद्ध सेवा प्रकर्णीं वर्ज्य. शुभ कर्मी याचा दोष नाहीं असें जाणावें.

राशींचेस्वामी. - सिंह राशिचा स्वामी रवी, कर्काचा चंद्र, मेष वृश्चिक याचा मंगळ, कन्यामिथुन यांचा बुध, धन मीन यांचा गुरु, तूळ वृषभ यांचा शुक्र, मकर कुंभ यांचा शनी, या प्रकारेंकरून बारा राशींचे स्वामीजाणावे.

चंद्र कोणेदिशेस आहे हें पहाणें - मेष, सिंह, आणि धन याराशींचा चंद्र पूर्वेसआहे असें जाणावें, वृषभ कन्या आणि मकर याराशींचाचंद्र दक्षिणेस, कुंभ तूळ मिथुन याराशीचा चंद्र पश्चिमेस, कर्क वृश्चिक मीन याराशींचा चंद्र उत्तरेस आहे. याप्रमाणें राशींचे चंद्र जाणावे.

फळ - सन्मुख चंद्र असतां प्रयाण अथवा कांहीं कार्यारंभ केल्यासअर्थ लाभ होईल. दक्षिणेस असल्यास सुख संपदा होईल. पाठीमागें असल्यास प्राण नाश करील. आणि वाम भागीं असल्यास धन क्षय होईल यास्तव चंद्र पाहून सर्व कार्यास आरंभ करावा.

चंद्र कोठें आहे तो पहाणें. - ज्या तिथीस चंद्र कोठें आहे असें पहाणें असेल त्या तिथी पर्यंत शुक्लपक्षादि तिथी गणून त्यांचे पांच पटकरावे. आणि त्यांत कृत्तिकापासून दिवसनक्षत्र पर्यंत गणून जी संख्या होईलतितकी मिळवून त्यांत १२ अंक मिळवावे. आणि एकंदर संख्येस नवानी भा-

गावें आणि शेष अंक राहील त्यावरून चंद्रमा कोठें आहे हा निश्चय जाणावा.

एक किंवा ४ किंवा ७ शेष राहातील तर जळीं चंद्र आहे असें जाणावें. व २-५-८ राहिलेतर स्थळीं, आणि ६-९ राहिलेतर आकाशीं आहे असें जाणावें.

फळ. - चंद्र जळीं असतां कार्यसिद्धी, स्थळीं असतां कार्य नाश, आकाशीं असतां मध्यम फळ जाणावें.

पंचक पहाणें. - शुक्लपक्ष आदीकरून ज्या दिवशीं पहाणें त्याच्या पूर्व तिथी पर्यंत तिथी गणून ज्यावेळीं पहाणें त्यावेळींचें लग्नही त्यांत मिळवून एकंदर संख्यां कांस नवांनीं भाग द्यावा. आणि शेष अंक राहील त्याजवरून पुढें सांगीतल्या प्रमाणें पहावें. एक मृत्यु २ अग्नि ३ निष्पंचक. ४ राजपंचक. ५ निष्पंचक ६ चोर पंचक ७ निष्पंचक ८ रोगपंचक. ९ निष्पंचक याप्रकारें जाणावें.

फळ. - प्रयाणास चोर पंचक वर्जावें, व्रतबंधादि संस्कार कर्मास रोगपंचक वर्जावें, राज सेवेस राजपंचक वर्जावें, गृहा रंभास अग्नि पंचक वर्जावें. आणि मृत्युपंचक सर्व कर्मास वर्जावें.

लग्न पहाण्याचा प्रकार. - मीन मेष हीं लग्नें चार चार घटिका, वृषभ-कुंभ हीं दोन लग्नें साडेचार साडेचार घटिका, मिथुन मकर हीं पांच पांच घटिका, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धन, हीं सहा लग्नें ५॥ साडेपांच घटिका याप्रकारें करून बारा लग्नें जाणावीं.

यांचा प्रतिदिवशीं भोगावयाचा प्रकार. - मीन मेष हीं दोन लग्नें संक्रांत जाहल्या दिवसापासून प्रतिदिवशीं आठ पळें भोगून एका महिन्यानें संपतात, मग दुसरी संक्रांत लागते तेव्हां तें लग्न सूर्योदयीं प्राप्त होतें, त्याचाही क्रम अशाच प्रकारें पहावा. वृषभ कुंभ हीं दोन लग्नें नऊ नऊ पळें भोगितात. मकर मिथुन हीं दोन लग्नें दररोज दहा दहा पळें भोगितात, कर्क सिंह कन्या तूळ वृश्चिक धन हीं सहा लग्नें दररोज ११ अकरा पळें भोगितात या प्रमाणें लग्न भोग्य जाणावें.

चतुष्पद पशू देण्या घेण्यास मुहूर्त. - शनिवार, सोमवार, बुधवार,

यादिवशीं अथवा नक्षत्रें वर्ज्य आहेततीं कोणेही वारीं असता, मूळ, भरणी, चित्रा, तीनउत्तरा, रोहिणी, श्रवण, अडळ चक्र, बाहेरचाल, अष्टमी तीथ, रिक्ता तिथी, कल्याणी (ह्मणजे भद्रा) संक्राति, सिंहलग्न, कुलिक, व्यतीपात, वैधृत आर्द्रा पौर्णिमा, अमावास्या यावर गाई, म्हशी, शेळ्या, घोडे, मेंढ्या, आदिक रून चतुष्पद जनावरें घरीं आणूंनये. कोणी ग्रंथांतर मतें सोमवारीं मेंढी, बुध वारीं गाय, शनिवारीं घोडे घरीं आणूंनये.

याचा भाव पूर्व श्लोकाचे अर्थांत सांगीतला त्या प्रमाणें पाहून क्रयविक्रय करून नवीन आणणें देणें तें विचारें करावें.

तिथींचीं लक्षणें. — प्रतीपदा नंदा, द्वितीया भद्रा, तृतीया जया, चतुर्थी रिक्ता, पंचमी पूर्णा, याप्रमाणें तीन क्रमानीं पंधरा तिथींस नावें जाणावीं. शुक्लपक्षीं ज्या अधम त्या कृष्ण पक्षीं सम, ज्या कृष्ण पक्षीं अधम त्या शुक्ल पक्षीं सम जाणाव्या.

कार्यविच्यार. — चित्रें लिहावीं, मालवदें, उपरीया, सोपे, दुर्ग, देउळें, बावी, तळीं, अश्वशाळा, गजशाळा, आड, गाईचे वाडे, शेळ्या मेंढ्या यांचे वाडे, शेतें अलारीं, जिराईत, हळद, मके, केळी, ऊंस, आदिक रून नाटक शाळा, शुभ कृत्यें अलंकार, गाडे, रथ, पालखी, हीं सकल कामें नंदातिथीस करावीं.

पौष्टिक, शुभ कर्मे, औषधें, शिल्पकर्म, सूतारकाम, स्वारी सजाणें, यात्रा, विवाह, शुभ कृत्यें, पाषाण कृत्यें हीं सर्व कर्मे भद्रातिथीस करावीं.

जया व रिक्तातिथीस कोणतीं कार्यें करावींतीं. — चाकर, बटिक, गुलाम, रत्नें, मोत्यें, सोनें, रुपें, तांबें, कांच, चुडे, गाई, म्हशी, घोडे, उंट, बैल, गाडा, शेळी, मेंढी, उत्तमवस्त्रें, यावीं घ्यावीं. रिक्तातिथीस घात पात, वध, बंध, विषप्रयोग, जळिनमार, वस्त्रें, लोखंड कृत्यें, उग्र कृत्यें, व दुष्ट कृत्यें हीं कर्मे करावीं.

पूर्णातिथीस काय करावेंतें. — मंगल कार्ये, विवाहादिक, यात्रा, पौष्टिक ह्मणजे अनेक प्रकारें ग्रह मखादिक शांति करावी. आणि अमावास्येस सर्व पितृकर्मे मात्र उक्त अन्य सर्व कर्मे वर्जावीं.

वारांचीं फळें सांगतों.

रविवारीं कृत्यें. - राज्याभिषेक, अनेक उल्हास कृत्यें, सेवाकर्म, पशुकर्म, मंत्रोपदेश, अनेक औषधी, साधन, शास्त्र कर्म, सुवर्ण, तांबें, कंबलादिक व्यापार, ह्मणजे अनेक प्रकारचीं दुकानें, काष्ठ संग्रह आणि कलह, संग्राम हीं कर्में रविवारीं करावीं.

सोमवारीं कृत्यें. - शंखाचे अलंकार, उदकाचीं कर्में, मोत्यें, रुपें, ऊंस लावणें, स्त्री भोग, वृक्षारोपण, उदक भूषणें, मळे, बागाईत, पुष्पांचीं आभरणें, शेत, गायनकला, यज्ञक्रिया, गायन, अंबरें, हीं सर्व कृत्यें सोमवारीं करावीं.

भौमवारीं कृत्यें. - अनेक प्रकारें भेद, फितुर, खोटें कर्म, विष प्रयोग, अग्निकृत्यें, शस्त्रघात, बंधनादि प्रकार, अनेक घातकर्में, शठत्व कर्में, दंभ अहंकार, सेनेंत प्रवेश, सुवर्ण, आणि पोंवळें यांचा व्यापार, इतकीं कृत्यें मंगळवारीं करावीं.

बुधवारीं कृत्यें. - अनेक विद्यांचा निपुण अभ्यास करणें, आणि नाना प्रकारचे अभ्यास करणें, अध्ययन करणें, नाना प्रकारची कुशलता शिकणें, सुतारकाम, लेखनविद्या सर्व प्रकारची शिकणें. धातुक्रिया, अनेक युक्ती, संधि प्रकार, स्वारीस जाणें व येणें अनेक वादविवाद हीं कर्में बुधवारीं करावीं.

गुरुवारीं कृत्यें. - अनेक प्रकारचे धर्म करणें, औषधें, पौष्टिकें, यज्ञादि कर्में विद्याभ्यास, मंगलकृत्यें, सुवर्णाचे अलंकार, व अनेक प्रकारचीं नवीन वस्त्रें ग्रहण करणें, गृह प्रवेश करणें, यात्रेस जाणें, रथावर बसणें, औषध पेणें, भूषणें ल्यावीं हीं सर्व कर्में गुरुवारीं करावीं.

शुक्रवारीं कृत्यें. - स्त्रीभोग, गायनकला, शय्या, हिरे, रत्नें, नानावस्त्रें, अलंकार भूषणें, गाई ह्मशी यांचा संग्रह, द्रव्य संग्रह, शेताचीं कामें, हीं सर्व कृत्यें शुक्रवारीं केल्यानें लाभ दायक होतील.

मंदवारीं कृत्यें. - लोखंडी कृत्यें, शिशाचीं कृत्यें, अथवा दास दासींचा संग्रह अनेक पापकर्में स्नेह कर्में, विष कृत्यें, वाद्यें, गृहप्रवेश, बंधनादि कर्में, स्थिरकर्माची दीक्षा, हीं कृत्यें मंदवारीं करावीं.

कोणत्या नक्षत्रीं कोणतें कार्य करावें तें - रोहिणी तीन्ही उत्तरा, हीं ध्रुवनक्षत्रें, यावर बीजें पेरावीं, गृहग्रामप्रवेश करावा, आराम जागा निर्माण करावी, एवंसर्व स्थिरकर्में करावीं.

मृदुनक्षत्रीं कृत्यें. - चित्रा, अनुराधा, मृग, रेवती हीं मृदु मित्र नक्षत्रें यावर मित्रत्व रतिभोग, विलास, नानाभूषणें धारण, नाना वस्त्रे ग्रहण, व मंगल कार्यें करावीं.

लघु नक्षत्रीं कृत्यें. - अश्विनी, पुष्य, हस्त, अभिजित् हीं ४ लघुनक्षत्रें यांवर दुकानदारी, अनेक भूषणें, नानाकला, अनेकभोग, औषधीसेवन, सुनारकामाचा अभ्यास, हीं सर्व कर्में करावीं.

चर नक्षत्रांवर कृत्यें. - श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, स्वाती, हीं पांचनक्षत्रें चर, यांवर अनेक वाहनांवर आरोहण करावें, व अनेक बाग बगीचे आरामवनें, अशा मध्यें प्रवेश करावा.

उग्र नक्षत्रांवर कृत्यें. - तीन पूर्वा, भरणी, मघा पंचक, हीं नक्षत्रें उग्र, या नक्षत्रांवर पठत्व, विष घातादिक प्रयोग, मरण, शस्त्रकर्म, अग्निदाहादिक हीं कर्में करावीं.

मिश्र नक्षत्रांवर कृत्यें. - कृत्तिका, विशाखा हीं दोन नक्षत्रें मिश्र संज्ञक यावर मित्रता वशिष्वाई अग्निकृत्यें व साधारण कार्यें करावीं.

तीक्ष्ण नक्षत्रांवर कृत्यें. - मूळ, ज्येष्ठा, आरद्रा, आश्लेषा हीं तीक्ष्ण दारुण नक्षत्रें. यांवर भूतपक्षादिक मंत्रसाधनें, आणि घोट बंधनें हीं कर्में क०

कोणते करणावर कोणतीं कार्यें करावीं. - बवादि अकरा करणांचीं नावें अनुक्रमें, बव, बालव, कौलव, तैतिल, गरज, वणिज, विष्टी, शकुनी, चतुष्पाद, नाग, किंस्तुघ्न, एवं ११ आहेत. यांचा क्रम शुक्लपक्ष, प्रतिपदेचे पूर्व दळीं बव करण आणि उत्तर दळीं ही बव; द्वितीया पूर्वदळीं बालव, तृतीया पूर्व दळीं तैतिल, उत्तर दळीं गरज, चतुर्थी पूर्वदळीं वणिज, उत्तर दळीं विष्टी, एवं अष्टावृत्तिः वद्य चतुर्दशी उत्तरदळी शकुनी अमावास्या पूर्व उत्तर दळीं चतुष्पाद् नागशुद्ध एक किंस्तुघ्न एवं च्यार ध्रुवकें.

स्थिर-चर कर्मे ववकरणीं करावीं, बालव करणीं स्वहित, कौलवीं स्त्रीसमागम, प्रीती, तैतिलीं शरणागत आश्रय करावे, गरज करणीं बीजाश्रय कर्म करावें, वणिजकरणीं वाणिज्य ह्मणजे व्यापार स्थिर कर्में करावीं. विष्टिकरणी विष, अग्निशस्त्रें, क्रूरकर्में करावीं. मंत्र औषधी शकुनीकरणीं कर्में करावीं. गाई, ब्राह्मण, राजसेवा, पितृकर्मे चतुष्पाद् करणीं करावीं. नागकरणीं सौभाग्य, हरणादिक दारुण कर्में करावीं किंस्तुघ्न करणीं शुभ, मंगल, स्थिर, अशीं कर्में करावीं.

अधोमुख नक्षत्रांवर कृत्यें. - मूळ, कृत्तिका, मघा, विशाखा, भरणी आश्लेषा, तीन पूर्वाही अधोमुख नक्षत्रें. यांवर विहिरी, कूप, तळें, अनेक पेवें आदि करून करावीं. ठेवणी ठेवावी. अथवा काढावीं, द्यूत खेळावें. नाना प्रकारचीं बलिदानें करावीं, अनेक प्रवेश व गणितारंभ करावा.

तिर्यङ्मुख नक्षत्रांवर कोणतीं कार्यें करावीं. - ज्येष्ठा पुनर्वसु हस्त, अश्विनी, मृग, अनुराधा, स्वाती, चित्रा, हीं सात नक्षत्रें यांवर घोडे, नाना वाहनें, उंट गाढव आदिकरून जनावरें यांचें पालन अधिकार परत्वें करून आरोहण करावें अनेक मंत्र चालवावे. नांगर धरावे, या प्रकारचीं कृत्यें या नक्षत्रांवर करावीं.

ऊर्ध्वमुख नक्षत्रांवर कार्यें करावं. - पुष्य, आर्द्रा, श्रवण, उत्तरा, शततारका, रोहिणी, उत्तराषाढा, उत्तरा भाद्रपदा, धनिष्ठा, हीं नऊ नक्षत्रें ऊर्ध्वमुख होत. यांवर गुढिया, तोरणें, पताका, शिखरें, देवालयाचीं कामें, आगम, छाया, निवास इत्यादि हितकारक कृत्यें, व राज्याभिषेक कृत्यें वरसांगीतल्या नक्षत्रांवर करावीं.

नष्टवस्तु प्रश्न. - तिथी, वार, नक्षत्रें, लग्न, वतीन एकत्र करून पांचानीं भागावें शेष १ उरलातर पृथ्वींत आहे. २ उरलेतर जलांत आहे नलभ्यते. ३ उरलेतर आकाशीं आहे. नलभ्यते. ४ उरलेतर स्नेजराजानें वस्तू नेली. ५ उरलेतर वायूचे गयीं वस्तू आहे. शोक सांगतये असें जाणावें.

गर्भिणी प्रश्न. - गर्भिणी स्त्री ज्या लग्नावर प्रश्न करील त्या लग्नीं ग्रह

पाहावे· लग्नापासून तृतीय,पंचम,सप्तम आणि नवम इतक्या स्थानीं रवि गुरु भौम हे ग्रह असले तर पुत्र होईल· आणि त्या स्थानीं अन्य ग्रह असल्यावर कन्याहोईल·

मुष्टिप्रश्न· – पृच्छकाचे मुष्टींत कोणते वर्णाची वस्तू आहेती सांगावी· मेष लग्न असेलतर पिंवळी, मिथुनी निळी· कर्की पांढरी, सिंहीं धूम्र वर्णाची· कन्यालग्नीं नीळमिश्रित, तुळीं पीतमिश्रित, वृश्चिकीं ताम्रमिश्रित· धनी पीत मिश्रित मकरीं कृष्णवर्ण, कुंभीं लोहमय, मीनी पीतवर्ण, वस्तू आहे असें जाणावें·

अंकप्रश्न· – प्रश्न पृच्छकांकडून अष्टोत्तर शताचे अंकांतून एके अंकाचें नांव घेववावें आणि त्यास बारानीं भागावें शेष उरले त्याचीं फळें १ अथवा ९ अथवा ७ उरलेतर विलंबें कार्य होईल· शेष ८-४-१०-५ उरलेतर नाश, ११ सिद्धी ३ वृद्धी, २-६,१२ उरलेतर शीघ्र कार्यसिद्धी होईल·

रोगीप्रश्न· –तिथी वार नक्षत्रें लग्न आणि प्रहर प्रतिदिवशीं एकत्र करून आठांनीं भागावें शेष उरेल त्याचें फळ शेष ३ अथवा ७ उरलेतर देवाची बाधा २-८ उरलेतर पितरांची बाधा, ६-४ भूतबाधा, १-५ उरलेतर बाधानाहीं·

प्रस्थानठेवण्यासमुहूर्त· – कृमुहूर्तावर गमन करण्यास अभाव आहेतर प्रस्थानीं वस्तू ठेवणें, त्या वर्ण परत्वें सांगतों· ब्राह्मणास यज्ञोपवीत क्षत्रियास शस्त्र, वैश्यास मधु, आणि शूद्रास फळ या प्रमाणें जाणावें· आणि सर्वांस स्वर्णवर्ण धान्य·वस्त्र हेंउक्त होय·

प्रस्थानकितीदिवसउपयोगी पडतें· – राजांहीं प्रस्थान ठेविल्यावर दहादिवस, अन्यांस पांचदिवस· तो मुहूर्त उपयोगी पडतो· परंतु वस्तु प्रस्थानीं अर्ध फळ जाणावें·

इति स्फूटज्योतिष समाप्त·



मयुर ध्वज आख्यान प्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥श्लोक॥ ॥ वंदोनि विघ्नहरणा मति पूर्ण भावें॥ स
प्रेम कृष्णचरणा प्रणिलें स्वभावें॥ संतांप्रतीनमुनियां मग आदरानें॥ सद्भक्तकी
र्तिबदतोंअतिसादरानें॥१॥ ॥दिंडी॥ ॥ सोमवंशींविख्यातभूपराणा
पुण्यवंतसात्वीकधर्मजाणा॥ चौघेबंधू सादरसेवनासी॥ रमानाथसर्वस्वेंसा
ह्यज्यासीं॥२॥ ॥साखी॥ ॥ गोत्रजाघ्नतेंदुरितनिरसना॥ तेणेंहय मेधा
तें॥ आरंभुनियां अश्वसोडिला, पृथिवीजिंकायातें॥३॥ पार्थासहश्रीकृ-
ष्णाजित्यानें,रक्षितचालतिमागें॥ हंसध्वजअनुशाल्वादिकने, अपार भूपति
संगें॥४॥ ॥ओवी॥ ॥ बभ्रुवाहनाचेंराज्यटाकुन॥ पुढेंचालिलाश्याम-
कर्ण॥ तोंनिकडोनदुसरायज्ञाश्वजाण॥ आलामयुरध्वजाचा॥५॥ नाम्रध्वज
तयाचाउत्र॥ महाप्रतापीकीर्तिमंत॥ तोत्यातेंरक्षकअतिसमर्थ॥ तेणेंपांडवा
श्वधरियेला॥६॥ ॥आर्या॥ ॥ कृष्णह्मणेंपार्थातें, समय पुढेंमजकठी
णहावाटे॥ ताम्रध्वजअतियोद्धा, लाविलसकळांहिमृत्युच्यावाटे॥७॥ ॥
दिंडी॥ ॥शिखीकेतू भूपतीवीरसाजे॥ सत्वधीरभक्ततोमहीगाजे॥ रत्न
पूरींनर्मदातिरींयज्ञ॥ आरंभूनीसोडिलाशामकर्ण॥८॥ ॥आर्या॥ ॥
ऐसेंबोलतअसतां, ताम्रध्वजहोयसोडितावाण॥ तेंदुःसहवीरांतें, हांउनिआ

कर्षितीक्ष्णेंप्राण ॥ ९॥ ॥श्लोक॥ ॥उभयदळमिळालेंकंदनाघोरघायीं॥ धडकतिरणवाद्येंनादव्योमींनमायी॥ पडधडरथनेंटेंकंपतेव्हांक्षितीला॥ उरगपतिमनींतोमानिमोठ्याभितीला॥१०॥ ॥सारवी॥ ॥ ताम्रकेतुनेंवीरसर्वही बाणेंजर्जरकेले॥ ऐसेंपाहुनपुढेंधांवला, मदनपुत्रत्यावेळे॥ ११॥ ॥ आर्या॥ ॥ क्षोभुनिअतिशयतेव्हां, बोलेअनिरुद्धताम्रकेतूतें॥ सरलेंतवायु येथें, पाठविलेंम्हणुनअंतकेंतूतें॥१२॥ ॥दिंडी॥ ॥ ऐसेंवाक्यबोलुनी तयेवेळां॥ दिव्यबाणेंभेदिलेंउरस्थळा॥ तेणेंआलीत्याक्षणींघेरित्यासीं॥ नयामंधींभंगिलेंवाहिनीसीं॥१३॥ सैन्यतेव्हांपाडिलेंतीनक्षोणी॥ रक्तसरितावाहल्यातयेक्षणी॥ ऐसेंदृष्टीपाहतांताम्रकेतू॥ क्षोभुनीयांमांडिलाप्रळयअंतू॥ १४॥ ॥श्लोक॥ ॥ बळेसोडुनीदिव्यशासायकानें॥ महीपाडिलेंत्याउरवानायकानें॥ असेंदेखतांकर्णसूनूसकोपें॥ करीत्याचिवास्यंदनाघातरोपें॥ १५॥ ॥छंद॥ ॥ मगदुजारथीराजनंदनू॥ बहुनियांकरीघोरकंदनू॥ तोहिछेदिलाक्षणनलागतां॥ यापरीशतागणतिमोजितां॥१६॥ ॥सारवी ॥ऐसाजर्जरकरुनितयानें, अपारवधिलीसेना॥ रक्तनघावहुपूरेंदाटुनि, जातीनिजपतिभुवना॥१७॥ ॥आर्या॥ ॥ शिखिध्वजात्मजतेव्हां, पावुनिअत्यंतजाणकोपातें॥ पाडीअसंख्यकरका, करुनांमूर्छितकर्णपुत्रातें॥ १८॥ श्लोक॥ ॥ तेव्हांपार्थसुतेंत्वराकरुनियां ताम्रध्वजाअंबरीं॥ बाणेंदिव्यतदाकरीउडवितां तोविस्मयाअंतरीं॥ त्वेषेंत्याउतरोनिभूतळितयें बीभत्सपुत्राप्रति॥ पीडीलाशरदिव्यभेदुनितदामूर्छोनवेगेंक्षिती॥१९॥ ॥छंद॥ ॥ सात्यकीवरीसोडुनीगदा॥ मारिलामहावीरतोतदा॥ यौवनाश्वहीपाडिलाशरें॥ नीलकेतुतेंमारिलेंत्वरें॥२०॥ प्रळयमाडिलाआजिबोलती॥ पळतिदेखुनीवीरत्यांमनी॥ काळदंडसेबाणसोडुनी॥ पाडिलीक्षणेंसकळवाहिनी॥२१॥ ॥ओवी॥ ॥ पार्थासींम्हणेजगजीवन॥ आपणउरलोंदोघेजण॥ ताम्रध्वजप्रतापीगहन॥ नचलेअभिमानययापुढें॥२२॥ ऐकोनिकोपलाकिरीटी॥ करुनअमोघबाणाचीदृष्टी॥ मयुरध्वजसुतातेंहिपुरी॥ केलेंउदाउदीनेधवां॥२३॥ ॥ आर्या॥ ॥ ताम्रध्वजकोपुनियां, अद्भुतकरिबाचआहलाकरणी॥ खगवत


उडोनिगगनीं, धरिलाअवचीतपार्थनोचरणीं ॥ २४॥ स्कंधींघेउनिहरितें, उ
डोनिगेला नभींविहंगनसा ॥ क्रोधेंश्रीपतिलत्ता, हाणुनपाडीतयासअसुगत-
सा ॥ २५॥ ताम्रध्वजासघेरी, येतापडलेनिघेहिभूवरते ॥ नेणोंप्राणगताच्या;
रीतीनेंजाण जाहलेवरिते ॥ २६॥ ॥ श्लोक ॥ ॥ नरवरकृतनेव्हांमूर्छना
सांवरूनी ॥ निजरथिमगवेगेंचालिलाआरु दोनी ॥ परममुदितचित्तें घेउनीअ
श्वयुग्मा ॥ रहिनकटकसंगेंपातलातोस्वसद्मा ॥ २७॥ ॥ साखी ॥ ॥
पितयालागीं हर्षयुक्ततो, सांगत थोरबडाई ॥ उभयकृष्णतेजिंकुनिसमरीं, के
लेमूर्छितगायीं ॥ २८॥ ॥ ओवी ॥ ॥ वृषकेत बभ्रुवाहन मदन ॥ हंस-
ध्वजादिससैन्यअनिरुद्धन ॥ आणिलेदोनी शामकर्ण ॥ जालेअश्वयज्ञआपुले ॥ २९
॥ ॥ छंद ॥ ॥ एकतांअसंवचनभूपती ॥ कोपुनीवदेनिजसुताप्रती ॥
निर्दयाधमानष्टतूंमहा ॥ केविदाविसी तोंडरेअहा ॥ ३०॥ पूर्णब्रह्मतो जाणश्री
हरी ॥ टाकिलेकसबाणत्यावरी ॥ आणितासित्यापार्थुनीजरी ॥ धन्यमानितोंतू
जरेतरी ॥ ३१॥ ॥ पद ॥ ॥ भूपतिबोलतकुमरा, वोरवटेंचिकेलेंभारी
॥ भूपति० ॥ ध्रु० ॥ विधिहरस्मरमुनिज्यातें, सप्रेमेंह्रदयींध्याती ॥ निगमागम
सर्वहिकाळ, स त्कीर्तिजयाचीगाती ॥ त्यापरमात्म्यावरशरतूं, प्रेरिलेसपाउन
भ्रांती ॥ ॥ चाल ॥ ॥ त्याजरीपार्थुनत्यातें ॥ आणितासिनिजसदनातें ॥ तरि
होतेबहुसुखमातें ॥ सरपरताअनहितकारी ॥ भूपति० ॥ १ ॥ कामदुहासदनीं
येतां· निजकाष्ठेंदंडीयेलें ॥ निजभाग्येंअमृतमिळतां, संमार्जनत्याचेंकेलें ॥ गो
सल्याकरिंपरिसातें, मूर्खत्वेंझोंकीयेलें ॥ ॥ चाल ॥ ॥ हेंविपरितकरणेंजेसें ॥
भासेनवकुननेसें ॥ बोलतांसद्गदऐसे, नेत्रांतुनवाहेवारी ॥ भूपति० ॥ २ ॥ बाज्या
च्याप्रीतीस्तवरेअश्वमेधकेलेसाही ॥ परितोप्राणविसावा तुष्टलाचि आजवरना-
हीं ॥ म्हणऊनसाप्रतहारेमांडिला आणिकपाहीं ॥ ॥ चाल ॥ - ॥ तोकरुणाघ
नह्रषिकेशी ॥ ममहेतुपुरवायासीं ॥ येतहोता आजसदनासीं ॥ जोकृष्णादाराकें
वारी ॥ भूपतिबोलतकुमरा ॥ वोरवटेंचिकेलेंभारी ॥ ३ ॥ ॥ ३२॥ ॥ आर्या ॥
हिकडेरणांतनेव्हां, सांडुनिमूर्छेसभक्तकैवारी ॥ सावधकरुनीपार्था, करुणामृ
नह्रष्टिदुःखतेंवारी ॥ ३३॥ ॥ दिंडी ॥ ॥ कृष्णबोलेमारुनीसर्वसेना ॥ रि

पूगेला घेउनी शामकर्णा ॥ ह्मणे जिष्णू राहिला तरी यज्ञ ॥ परी याची नूज लाला ज-
पूर्ण ॥ ३४ ॥ पदीं प्रेमें लागुनी दीनवाणी ॥ वदे कर्ता सर्व तूं चक्रपाणी ॥ दीन आह्मीं
लागलो तुझ्या कासे ॥ करीं आतां मानेल मना तैसें ॥ ३५ ॥ ॥ साखी ॥ ॥ कृष्ण
ह्मणे तो मयूरकेतू सात्विक आणी दाता ॥ धैर्यवंत बहु सांप्रत तुजला, दाखवितों
चल आतां ॥ ३६ ॥ ॥ छंद ॥ ॥ अर्जुना प्रती वदुनि या परी ॥ नटल वृद्ध सा-
विप्र तो हरी ॥ यष्टिका करीं घेतली नदां ॥ झोक जात से चालतां सदां ॥ ३७ ॥ ॥
श्लोक ॥ ॥ चंद्रार्धा कृति वांकली वपु दिसे कांपे जरेनें अती ॥ पायींसा जति पा
दुका सुबर व्यामा थां जटा शोभती ॥ अंगीं लोंबत चर्म भग्न रदते दाढी रुळे पांढरी ॥
कांसे चीर सुदाळ शाल्य विलसे तैसें च अंगावरी ॥ ३८ ॥ कर शिर पद कांपे बोलतां बो
लवेना ॥ अवघड पद चाली चालतां चालवेना ॥ मग कर धृत यष्टी पार्थ तो शिष्य रा-
णा ॥ धरुनि करि पुढें तो चालला शीघ्र जाणा ॥ ३९ ॥ ॥ आर्या ॥ ॥ काप-
ट्य वेष दोघे, स्वीकारुनि यज्ञमंडपा आले ॥ तेव्हां नृप सह अवघे, पाहुन त्यांते चकीत-
ते जाहले ॥ ४० ॥ द्विजसमुदायासह नृप, सन्मुख जाऊन त्यास सन्मानें ॥ आणुनि
पूजा प्रीती, केली सर्वोपचारि प्रेमानें ॥ ४१ ॥ ॥ दिंडी ॥ ॥ बद्धपाणी राहु
नी उभा भूप ॥ द्विजा पाहे तों दिसे दुःखरूप ॥ सद्‌दीन होउनी तये वेळां ॥ रडे स्फुंद
स्फुदुनी दळदळां ॥ ४२ ॥ अश्रुधारा लोचनीं वाहताती ॥ पाहुनी यां शंकला भूपचि
त्ती ॥ ह्मणे कायी जाहलें दुःख स्वामी ॥ खरें सांगावा रीन सर्व तें मीं ॥ ४३ ॥ ॥
छंद ॥ ॥ स्फुंदतां हळू विप्र तो ह्मणे ॥ वृत्त वर्तलें साच ऐकणें ॥ सांगतां मुखीं श
ब्द नाफुटे ॥ बोलतां बहू हुडका उठे ॥ ४४ ॥ ॥ साखी ॥ ॥ सुनसुनो राजा-
द्वारवतिका, द्विज मैं हूं रहिवासी ॥ ब्याहा पूतका होने खातर, घूमत हैं परदेशी ॥ ४५
सुनकर नेरी की रतसाने, चेला पूत बिलेके ॥ आवत थे गोंवन्में सिंघने, पकरे लरका
आके ॥ ४६ ॥ मैंनबनिनको हात जोरके, बिनती वैसी कीया ॥ किरपा करके बछुडा
छोगे, लेकर मेराके प्या ॥ ४७ ॥ पंचानन्नें वैसा कहियो, तेरी तन हैं जरठा ॥ उनके प-
लटा मैं मंगे सों, देउंगे बच जाबरा ॥ ४८ ॥ मयुधज नृपकी कारवत सेंतुम, छिनकर-
आधी काया ॥ देवोगे तो बिछुरजा बचडा, उसकारन मैं आया ॥ ४९ ॥ ॥ पद
॥ ॥ सांगे द्विज तो नृपतीला ॥ वितल्या वृत्ताते ॥ सांगे द्वि० ॥ ५० ॥ एकुलतें ए

कमाझेंबाळ॥त्यातेंमहद्रूपाहेकाल॥उदारमोठातूं भूपाळ॥ होइंरूपाळ यासमर्थी ॥ सांगेद्विज०॥ १॥ ऐकुनिकीर्तीतुझिहेफार॥ धाउनयेत होतोंसाचार॥ पंथींजा हालाऐसाकहार॥नमिळेथार मजआतां॥ सांगेद्वि०॥ २॥ ऐसें बोलत असतां जा ण॥दाविनव्याकुळजालाप्राण॥दुःखेंशोककरीनिर्वाण ॥जालीहाणथोर ह्मणे॥ सांगेद्विजनो०॥ ३॥ ॥दुसरें पद॥ ॥कहतेविप्रजिआपरुत्ता॥रूनरूनो नरनाथा॥ कहते०॥ ध्रु०॥ मेरासतगुनिएकेलाल॥ वांकोलेजावतहै काल॥ ध रमात्माहोतुमभूपाल॥वचनपालसतअपना॥ कहते०॥१॥ तेरीकीरतअपरंपा र॥रूनकरआवततेरेदार॥देवोगे दरब्यतुमउदार॥बिनआधारमेंदुबला॥ क हतेविप्र०॥२॥ ५०॥ ॥श्लोक॥ ॥ ऐसीऐकतांदीननेविप्रवाणी ॥नृपा- च्याबहूलोचनी येतपाणी॥ ह्मणे वोतरी हेतनूविप्रकाजीं॥समर्पूनहोईनमींधन्य आजी॥५१॥ धनरूनपशरूजायासर्वहीव्यर्थमाया॥क्षणिक मनुजकायानिश्च येंजायवांया॥ नरिचुकतअपायान्याचकीजेउपाया॥ ह्मणउन मनिंरायासौख्य तेंदेहयाचा॥५२॥ ॥ओवी॥ ॥भूपाळउदारदेहदानी॥ कर्वतआण विलासभास्थानीं॥ द्विजह्मणेरुद्मीपुत्रपांणी॥ गीतगाउनी कर्वतावें॥५३॥अ श्रुआलियातुझेनयनीं॥ फिबारडतांदेखिलें कोणी॥ कींमज दूषणलाविलियाह्म- णी॥जाईनउठोनीतात्काळ॥५४॥ ॥पद॥ ॥विनवीसकळांसीं॥भूप तिविनवीसकळांसीं॥ ध्रु०॥ सफलितमाझाजन्मजाहाला॥ नकरारवेदमनासी ॥भूपति०॥१॥ माझेंसार्थककरणेंआतां॥नपडामायापाशीं॥ भूपति०॥२॥ चित्तींविषण्णमानुनिर्विप्रा॥नवदादुःशब्दासी॥ भूपति०॥ ३॥ तुमत्रेंआजवर पालनकेलें॥मान्यकरावचनासीं॥ भूपति०॥ ४॥ ॥५५॥ ॥आर्या॥ दानें अपारदेउनि, नमिळेद्विजताम्रकेतुनातेहो॥जालासिन्दुमराया, मानितिबुध थोरविस्मयातेंहो॥५६॥ यालुनमस्तकिंकर्वत, वोदितिवधुपुत्रखपारवणावा- जे॥श्रीहरिनामोच्चारी, रत्नलानृपकीर्तिघोषनावाजे॥५७॥ ॥दिंडी॥ ॥ विप्रबोलेतेधवांमुख्याऐसे॥ कर्वतीतां ह्मणुनमीजात असे॥ तदांराजास्त्रीसुता खुणावीत॥ गावेंतुह्मींयेईलतसेगीत॥५८॥ ॥छंद॥ ॥भूपवाक्यतें ऐसियारिती॥ऐकुनीबहूखेद मानिती॥ कंठदाटलासबचेरवी॥ येतिहुंडके

गिळिलितेपरी॥५९॥ म्हणतिधन्यगा तूं शिखिध्वजा॥ लाविलीजगीं कीर्तिची-ध्वजा॥ कर्वतूनियांनिजवपू करें॥ अर्पिलीद्विजाथोरहारिरें॥६०॥ इच्छिलें मनी ब्राह्मणापनी॥ देयतो आनां कोण पूढती॥ बोलतां असें दुःखघोटिती॥ वात्यतेंद्विजापरिनदाविती॥६१॥ ॥श्लोक॥ ॥नगरजनकरीतीथोर आकांत पांही॥ रुदतिसकलदुःखें ऐकतां स्त्रनगेही॥ अमरगणविमानीं घेउनी सिद्धपुष्पें॥ म्हणतिअमितकेलीख्यातिहेविश्वि भूपें॥६२॥ ॥ओवी॥ ॥ मुखापर्यंतकर्वतिलेशरीर॥ तोनवलएकवर्तलें थोर॥ नृपाचेवामनेत्रींअपार॥ अश्रूधारचालिली॥६३॥ ॥साखी॥ ॥ऐसें दृष्टीपडतां द्विजतो क्रोधें जालाउठता॥ म्हणे हा दुःखेंरडतो पाखव नेघेंनिश्चयआतां॥६४॥ नृपकालरका औरप्रियानव, गर्डीहानत्सुराई॥ कहनभूपकों आपकोत्यजकर, जावनयाचकसाई॥६५॥ मनमों चिंताराव कररहे, द्विजतो रवानें धाया॥ प्रपंचनापरमार्थविनहि, विनारथजावतकाया॥६६॥ विकलभयातबिबदेधीरसों, आपने पास्त्रद्विजेंद्रा॥ हानसेंकरकेसोंगयपुकारत, सोतब आकर वेरा॥६७॥ पावपकरके नृपनबविप्रा, अरजकोरदिनबानी॥ सुनोसुनोजीकिरपाकरके, बातमेरी-निरबानी॥ पाठ॥ सुनोसुनोजीजिसकारनसो, नयननझरपतपानी॥६८॥ सव्यांगाकोतुमलेआनें, इनकासार्थकहोवे॥ वामघडाकेसार्थकनहिंसों उसकारनसेंरोवे॥६९॥ ॥ओवी॥ ॥ऐसीनृपाचीदीनवाणी॥ परिसोनिकळवळलाचक्रपाणी॥ दिव्यरूपचतुर्भुजप्रगटोनी॥ त्वरेंधरिलें मयुरध्वजा॥७०॥ कर्वतेंकारितांचीतत्काळ॥ दिव्यरूपआहलाभूपाळ॥ जयजयकारें गर्जतीसकळ॥ सुमनेंत्रिदशवर्षती॥७१॥ ॥दिंडी॥ ॥पार्थेपूर्वरूपतेंप्रकटिलें॥ नृपालागीं आदरें आलिंगिलें॥ समस्तांसिघेउनी हरिसवें॥ रणभूमीपातलेजाणवेगें॥७२॥ तदादेवें अद्भुतजाणकेलें॥ कृपादृष्टीनें त्यांतें उठविलें॥ हर्षेंसर्वगर्जतीनयेवेळीं॥ रत्नपूरापातलेसौख्यमेळीं॥७३॥ ॥श्लोक॥ ॥हरिवदतनृपातेंचालगाधर्मभेटी॥ नवकुन हयमेधेंपावलों पूर्णतुष्टी॥ सदळमगतयातें घेतला सात्यसंगें॥ उभय हरपुढें तेंसांडिलेआण वेगें॥७४॥ ऐसेंचरित्रबरवें हरिमेधिपाहे॥ जन्मेजयासमुनिजैमिनिसांगताहे॥

॥ तेंकृष्णादासवदलाअतिप्रेमभावें॥ साधुजनींपरिसतांकरवनेंस्वभावें ॥७५
॥ ॥ इतिमयुरध्वजआख्यानसमाप्त॥ ॥ ॥ आर्या १२ श्लोक १२
साख्या १७ छंद १० ओंव्या १० दिंड्या ११ पदें ३ एकूणसंख्या ७५ ॥



सिंहध्वजआख्यान.

